सिंहगड

दुसरी आवृत्ति

गणेश हरी खरे

क्यूरेटर : भा. इ. सं. मंडळ, पुणें.

मूल्य आठ आणे

निवेदन

या पुस्तिकेची दोन हजार प्रतींची पहिली आवृत्ति काढून सात वर्षें होत आलीं. स्थलवर्णनात्मक पुस्तक त्या त्या ठिकाणींच खपणार हें अंशतः खरें असलें व त्या दृष्टीनें या पुस्तिकेचा खप मर्यादित व्हावा हें नैसर्गिक असलें तरी सिंहगडाचा रोमहर्षक इतिहास विचारांत घेतां हिचा पुष्कळ अधिक खप होईल अशी अपेक्षा होती. पण तसें झालें नाहीं हें सांगण्यास दुःख होतें.

पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनानंतर गेल्या सात वर्षांत सिंहगडाविषयीं नवी माहिती मिळाली ती सर्व या आवृत्तींत घातली आहे. नव्या माहिती-साठीं पुण्याच्या पेशवे दप्तरांतील कित्येक रुमाल इ. १९४९ च्या पहिल्या सहामाहींत तपासले. पण श्रमाच्या मानानें समाधानकारक माहिती मिळाली नाहीं. सामान्यतः अनुभव असा कीं, पहिल्या आवृत्तीची माहिती गोळा करून मांडण्यांत जितका वेळ जातो तितक्या वेळांत प्रथमावृत्तीच्या एकतृतीयांशही माहिती मिळत नाहीं. तेव्हां केवळ श्रमांचाच विचार केला तर इतिहासलेखनांत पहिल्या आवृत्तीइतकेच श्रम दुसऱ्या आवृत्तीस पडतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. या आवृत्तींत अधिक वास्तव असा नकाशा घातला आहे.

ऐतिहासिक पुस्तक म्हटलें कीं, त्यांतील प्रत्येक विधानास विश्वास्य आधार देऊन संदर्भसूचन योग्य प्रकारें केलेंच पाहिजे. या धोरणानुसार मी प्रायः माझें प्रत्येक पुस्तक सजविण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्रजी सिंहगड व हिंदी सिंहगड अगदींच लहान असल्यानें तेथें मात्र आधार देणें किंवा संदर्भ दाखविणें शक्य झालें नाहीं. तो दोष या पुस्तकांत काढून टाकला आहे.

या पुस्तकांत सिंहगडाची एकूण एक, बारीकसारीक, झाडून सारी माहिती आली आहे असें म्हणतां येणार नाहीं. मी हें पुस्तक पदरमोड करून प्रसिद्ध करीत असल्यानें आणि मार्गदर्शिका म्हटली कीं तीवर किंमतीचें व किंमती-मुळें पृष्ठांचें बंधन येत असल्यानें मला येथें यापेक्षां अधिक माहिती देतां आली नाहीं. हें पुस्तक तयार करतांना माझे तरुण मित्र श्री. ब. मो. पुरंदरे यांचें मला फार साह्य झालें आहे हें येथें अवश्य नमूद करतों.

आपल्या या महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्रेतर प्रांतांत सिंहगडासारखे पन्नास तरी किल्ले आहेत कीं, ज्यांनीं मराठी इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. यांतील कित्येक किल्ल्यांचा इतिहास असा आहे कीं, त्या प्रत्येकावर यासारखें लहान मोठें पुस्तकच लिहावें लागेल.

(शेवटच्या पानावर पहा)

सिंहगड

इतिहास

या किल्ल्याचें सिंहगड हें नांव अर्वाचीन आहे. याचें जुनें, कागदोंपत्रीं आलेलें नांव कोंढाणा हें असून त्याचा बोलींत होत असलेला उच्चार कोंडाणा असा आहे. या उच्चारांत फार्सी लकब स्पष्ट दिसतें. पूना–पुणा या नांवाचा शुद्ध उच्चार पुणें आहे, तद्वत् या नांवाचा शुद्ध उच्चार कोंढाणें असा असला पाहिजे. चढ-उताराच्या अडचणीमुळें किल्ल्यावर बाजार किंवा पेठ वसणें अनैसर्गिक आहे. तेव्हां किल्ल्यावरील वस्तीसाठीं लागणारी बाजार-पेठ किल्ल्याच्या खालीं, पण त्याच्या जवळच कोठें तरी तयार होते. हीस सामान्यत: पूर हें नांव देत असावे. या किल्ल्याच्या आग्नेयीस सुमारें चार मैलांवर असलेलें कोंढणपूर गांव या किल्ल्याची बाजार-पेठ असावी. हें नांवही कोंढाणें या नांवावरून तयार झालेलें दिसतें. पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशीं अशी पेठ असून तीस नुसतें पूर हें नांव आहे.

महाराष्ट्रांत आज कमीजास्त प्रख्यात असलेल्या बहुतेक किल्ल्यांचा जन्म नेमका केव्हां झाला हें सांगणें प्राय: अशक्य आहे. यांतील बरेच किल्ले शिवपूर्वकालीं अस्तित्वांत होते याविषयीं शंकाच नाहीं. अनकाई, पन्हाळा, मार्कंडा, देवगिरि इत्यादि कांहीं किल्ले मुसलमानपूर्व कालांतहि प्रसिद्ध होते याविषयीं भरपूर पुरावे आहेत. सिंहगड किंवा कोंढाणा याचे निर्देश व तेथील अवशेष यांचा विचार केला तर याचा जन्मही मुसलमानपूर्वकालांत झाला असला पाहिजे असें अनुमान करतां येतें. याचे प्रत्यक्ष निर्देश मात्र मुसलमानी कालापासून सुरू होतात. पण त्या निर्देशांत त्याच्या बांधणीचा उल्लेख नसल्यामुळें वरील अनुमान करण्यास अधिक जागा आहे.

या गडाचा सर्वांत प्राचीन निर्देश इसामी नांवाच्या मुसलमान कवीनें इ. स. १३५० मध्यें रचलेल्या फुतूहुस्सलातीन किंवा शाह-नामा–इ–हिंद नांवाच्या फार्सी ऐतिहासिक महाकाव्यांत किंवा काव्यरूपी इतिहासांत आला आहे. यांतील २२३ व्या प्रकरणांत मुहम्मद तुघ्लुकानें कुंधीयाना किल्ल्यास वेढा घालून तो कसा घेतला याची माहिती आहे. हा ग्रंथ अगदीं अलीकडे (इ. १८३९, आग्रा) प्रसिद्ध झाला असला तरी हा किंवा यांतील माहिती फिरिश्त्यास उपलब्ध होती असें दिसतें. फिरिश्त्याच्या इतिहासाची ओळख सुमारें सवाशें वर्षांपूर्वींच झाली आहे. पण ही हकीकत सुमारें तीनशें वर्षें त्याच्या जीवनापूर्वींची असल्यामुळें ती खरोखर घडली होती कीं नाहीं याविषयीं शंका वाटे. आतां मात्र इसामीसारख्या सम-कालीन इतिहासकारानें ती नमूद केली असल्यानें तिच्या सत्यते-विषयीं संशय रहात नाहीं.

ती हकीकत अशी :– दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघ्लुक यानें या किल्ल्याच्या बाजूस स्वारी केली. त्या वेळीं हा किल्ला नाग-नायक नांवाच्या एका कोळ्याच्या ताब्यांत होता. त्यानें मोठ्या शौर्यानें मुहम्मद तुघ्लुकाचा प्रतिकार केला. पण पराभव झाल्या-मुळें त्यास किल्ल्याचा आश्रय घेणें भाग पडलें. मुहम्मदानें किल्ल्यास वेढा घातला. तेव्हां गडाजवळ जाण्यास एकच मार्ग होता तोही बंद करण्यांत आला व गडावर हल्ले चालू केले. सुमारें आठ महिन्यांच्या प्रतिकारानंतर गडावरील सामग्री खलास झाल्यामुळें नागनायक गड सोडून निघून गेला. मुहम्मदाचें निशाण तेथें चढलें व तो दौलताबादेस परतला. ही हकीकत इ. १३२८ च्या सुमारास घडली असा तर्क आहे (फिरिश्ता १।१३६).

अहमदनगरच्या निजामशाही कारकिर्दींतले या किल्ल्याविषयीं चार निर्देश आढळले ते असे :–

मलिक अहमद बहरी निजामशाह यानें आपल्या बापाच्या हयातीमध्येंच इ. १४८२–८३ च्या सुमारास कोकणांतील जुनेर, सिनेर व इतर किल्ले आणि प्रदेश जिंकण्याची स्वारी काढली. त्यानें मावळांतील अनेक किल्ले जिंकल्यानंतर तुंग व न(ति)कोना

हे किल्ले हस्तगत केले आणि तेथून कल्पनातीत लूट घेऊन जगप्रसिद्ध व श्रेष्ठ अशा कुंधाना (कोंढाणा) किल्ल्याकडे तो निघाला. त्याचें सैन्य किल्ल्याचे दृष्टीच्या टप्प्यांत येतांच तो किल्लाहि त्याच्या ताब्यांत आला. तो एका चाकराच्या हवाला करून अहमद पुरंदराकडे गेला (बुर्हान १८१, फिरिश्ता २।९४, केंब्रिज ३।१४१, पुणें ३।४४१).

हुसैन निजामशाहाचा बाप बुर्हान निजामशाह याच्या कारकिर्दीच्या अखेरीस (इ. १५५३ अखेर) त्याच्या ताब्यांत जे ५८ किल्ले असल्याचें सांगितलें आहे त्यांत कोंधाना (कोंढाणा) असल्याचें नमूद आहे (बुर्हान ३५८).

बुर्हान निजामशाहानें आपल्या कारकिर्दीत नसीरुल्मुल्क नांवाच्या एका बंडखोरास कुंधाना (कोंढाणा) किल्ल्यावर कैदेंत टाकलें होतें. बुर्हानचा दुसरा मुलगा मीरान अब्दुल कादिर यानें आपला थोरला भाऊ हुसैन याच्या ऐवजीं आपणासच अहमदनगरची गादी मिळावी यासाठीं खटपट सुरू केली; परंतु तींत यश न आल्यानें त्याला दर्या इमादशाह याच्या आश्रयास पळून जावें लागलें. याच वेळेस बुर्हानचा तिसरा मुलगा मीरानशाह हैदर यानें आपला सासरा मख्दूम खाजा जहान याच्या मदतीवर विसंबून आपला थोरला भाऊ हुसैन याच्या विरुद्ध बंड करण्याचा बेत केला. ही संधि साधून नसीरुल्मुल्कनें कोंढाण्यावरून आपली सुटका करून घेतली आणि मीरानशाह हैदर यास मिळण्याचें ठरविलें. हुसैन निजामशाहानें हें बंड मोडण्याच्या कामीं मौलाना शाह मुहम्मद याची नेमणूक केली. त्यानें अहमदनगराहून इतक्या जलदीनें कूच केलें कीं, एका रात्रींत तो कोंढाण्यापाशीं आला. नसीरुल्मुल्कनें आपला टिकाव लागणार नाहीं असें पाहून पळ काढला; पण त्यास पकडून ठार करण्यांत आलें. हा प्रसंग इ. १५५४ च्या आरंभीं घडला (बुर्हान ३६७).

इ. १५६९-७० मध्यें मुर्तजा निजामशाहानें खूंझा हुमायून हीस पकडून सिनेर (शिवनेर)च्या किल्ल्यावर कैदेंत टाकलें आणि ताजखान, ऐनुल्मुल्क यासारख्या तिच्या होत्सात्यांस नोकरींतून

कमी करतांच अहमदनगरास गोंधळ उडाला. त्याचा फायदा घेण्या-साठीं आदिलशाही किश्वरखान कांहीं लोक व लश्कर बरोबर घेऊन दारूर (धारूर) येथें आला व तेथें त्यानें किल्ला बांधण्यास सुरुवात करून थोडक्याच दिवसांत तो सर्व तऱ्हेनें मजबूत बनविला. नंतर बादशाही मुलूख ताराज करून तेथून जवळच असलेला कोंधाना नांवाचा गड त्यानें हस्तगत केला आणि तेथून बादशाही मुलुखास तो त्रास देऊं लागला अशी बुर्हानमध्यें माहिती आहे. पण कोंढाणा धारूरपासून फार लांब आहे. फिरिश्त्यानें एव्हां हा किल्ला विजापुरी लश्करानें हस्तगत केला, पण त्याचें कारण मुर्तजानें विजापूरच्या अली आदिलशाहास वारंवार दिलेला त्रास हें होतें असें सांगितलें आहे. याचें साल दुसरीकडे इ. १५६७ दिलें आहे (केंब्रिज ३।४५१; बुर्हान ४४४; फिरिश्ता-ब्रिग्ज भाषांतर पृ. ३।४२६).

सुमारें तीनशें वर्षांच्या मुसलमानी अमलाचे कालांत या गडाविषयीं एवढेच उल्लेख सांपडले. पण जसजसें शिवकालाच्या जवळजवळ यावें तों तों याविषयीं अधिकाधिक माहिती देणारे निश्चित उल्लेख आढळतात.

इ. १६०० च्या सुमारास शिवाजी महाराजांचा आजा मालोजी यास भीमा व नीरा या दोन नद्यांमधील कांहीं प्रदेशाची जागीर निजामशाहाकडून मिळाली. तो प्रदेश पुणें जिल्ह्यांतील इंदापूरच्या बाजूचा होता. तेथील पिढीजाद देशमुख्याही शहाजी व त्याचे भाऊबंद यांजकडे चालू होत्या. ही जागीर शहाजीच्या कारकिर्दींत पश्चिमेकडे वाढत वाढत थेट सह्याद्रीस जाऊन भिडली आणि मावळांतील अनेक देशमुखांचा शहाजीशीं संबंध आला. त्या वेळीं किल्ल्यास महत्त्व असल्यानें जागीर कोणाचीहि असली तरी तीमधील निदान महत्त्वाचे किल्ले जागीर देणारी सत्ता आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करी. यामुळें हा गड अनेकदां मुख्य सत्तेनें नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांत असलेला दिसतो.

शहाजी प्रथम निजामशाही नोकरींत होता. तींत असतांच त्यानें इ. १६२४ सालीं भातवडीच्या लढाईंत मोठा पराक्रम गाज-

विला. पण या पराक्रमामुळें त्याचा तेथें मत्सर सुरू झाला. म्हणून त्यानें निजामशाहीस रामराम ठोकून आदिलशाहींत प्रवेश केला. सरलश्कर या नात्यानें तेथें त्यानें अदमासें तीन वर्षें काढिलीं. पण तेथें नीट बस्तान बसलें नाहीं म्हणा किंवा निजामशाहींत अधिक क्षेत्र मिळेल या आशेनें म्हणा तो आदिलशाही सोडून परत निजामशाहींत आला. पण तेथील अंदाधुंदी कारभारांत लवकरच त्याचा सासरा लखूजी जाधवराव याचा खून झाल्यामुळें त्यास उद्वेग वाटून त्यानें मोगलांची नोकरी धरली. परंतु मोगलांनीं दिलेल्या पाचहजारी मनसबीमुळें त्याचें मुळींच समाधान झालें नाहीं. म्हणून तो लवकरच निजामशाहींत परतला. इकडे परत आल्यावर त्यास असें दिसून आलें कीं, ज्यांनीं निजामशाही वांचविण्याची खटपट करणें योग्य ते मुसलमान बहुतांशीं मोगलाईस सामील झाले असून निजामशाहीचे अभिमानी कोणीच राहिले नाहींत. मराठ्यांना तर तिजविषयीं आत्मीय भावना वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. शहाजीनें विचार केला कीं, निजामशाही तारण्याची आपण खटपट करावी. तरली तरी आपलें महत्त्व वाढेल, बुडाली तरी आपली कर्तबगारी इतर शाह्यांच्या ध्यानांत येऊन आपलें महत्त्व टिकेल. म्हणून त्यानें निजामशाही घराण्यांतील एका मुलास गादीवर बसवून त्याचे नांवें राज्यकारभार चालू केला. सुमारें चार वर्षांच्या धडपडीनंतर त्याची खात्री झाली कीं, निजामशाही वांचत नाहीं. तेव्हां विजापुरी सरदार रणदुल्लाखान याच्या मध्यस्थीनें त्यानें मोगल व आदिलशाही यांशीं तह केला. तदनुसार निजामशाही वारस मोगलांच्या स्वाधीन करण्यांत आला व इ. १६३६ मध्यें शहाजी कायमचा आदिलशाही नोकरींत शिरला.

शहाजीनें अशा रीतीनें धरसोड केली तरी त्याचें महत्त्वही कमी झालें नाहीं अगर त्याची जागीरहि फारशी बदलली नाहीं. शहाजी एव्हां अशा तोलाचा सरदार बनला होता कीं, त्याच्या पराक्रमासाठीं तो प्रत्येक सत्तेस हवासा वाटे. पण त्याचें तंत्र सांभाळणें मात्र त्यांना नकोसें होई. त्याची नोकरी सामान्यतः जरतरची असे. त्यास प्रत्येक वेळीं अधिकाधिक जागीर लागे. म्हणून

या सत्तांनीं त्यास सरहद्दीवरची जागीर दिली. हेतु हा कीं, शहाजी एकनिष्ठ राहिला किंवा न राहिला तरी लढाईचे वेळीं त्याच्या जागीरीस त्रास पोंचेल, राज्याच्या गाभ्यास उपसर्ग लागणार नाहीं. उलट यामुळेंच शहाजीला आपल्या जागिरींत अनियंत्रित, मनमाने तसा अमल चालवितां येई. याचा फायदा शिवाजीस स्वराज्य स्थापनेसाठीं करून घेतां आला.

इ. १६३६ पूर्वीं कांहीं महिने मोगल व आदिलशाह हे एक होऊन निजामशाहीचे प्रतीक शहाजी भोसले यास बुडविण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचा एक भाग म्हणजे शहाजीकडून कोंढाणा पुरंदर वगैरे किल्ले हस्तगत करणें हा होय. पैकीं कोंढाण्याचा किल्लेदार सीदी अंबर यास धरून हा किल्ला हस्तगत केला तेव्हां तेथें निजामी सत्तेचा ५०।६० हजार होन खजिना होता तो आदिलशाहास मिळाला. मात्र हें करीत असतां कान्होजी बाजी सिलिमकर हा मारला गेला असें दिसतें. उलट शहाजी माहुलीच्या वेढ्यांत अडकला आणि वेढा घालणाऱ्यांपैकीं आदिलशाही लोकांच्या मदतीसाठीं विजापुराहून डोणज्याच्या खिंडींतून खजिना जात असतां निजामशाही सरदार मुधाजी मायदे यानें तो लुटला. त्यांत एक लक्षाहून अधिक होनांचा ऐवज त्याच्या हातीं लागला. पहिला प्रसंग इ. १६३५ तर दुसरा इ. १६३६ मध्यें घडला असावा. विजापूरचा सरदार रणदुल्लाखान यानें कारी (रोहिड-खोरें–भोर) चा देशमुख कान्होजी जेधे यास घातलेल्या एका पत्रांत कोंढाणेकरी हरकत मांडली आहे तरी मन घालून गडास वेढा घालावा व किलेदारास कैद करून एकनिष्ठा दाखवावी असें लिहिलें आहे तें यांतील पहिल्या प्रसंगास उद्देशून असावें (पुद ३।१४०; रा १७।७, १०; सा २।२२७).

या अदलाबदलीच्या काळांत शहाजीस आपली बायकामुलें सुरक्षिततेसाठीं वारंवार निरनिराळ्या ठिकाणी ठेवावीं लागलीं असतील हें उघड आहे. शिवजन्माचे वेळीं तीं शिवनेरीवर होतीं तर निजामशाही वांचविण्याचा प्रयत्न चालू असतां तीं बहुधा खास जागीरीमध्यें सिंहगडासारख्या किल्ल्यावर ठेवलीं असतील.

पुणें गॅझिटियरमध्यें इ. १६३३ च्या सुमारास त्याचीं बायकामुलें सिंहगडावर रहात असत असें सांगितलें आहे तें कशावरून हें समजत नसलें तरी तशी शक्यता मात्र आहे. पण इ. १६३६ मध्यें आदिलशाही नोकर बनल्यावर त्यानें आपलीं बायकामुलें कर्नाटकांत नेलीं होतीं व इ. १६३९ मध्यें त्यांना आपल्या जागिरींत जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें शिवाजीसह जिजाबाई वगैरे मंडळी शिवापूर, पुणें, पुरंदर इत्यादि ठिकाणीं वस्ती करून राहूं लागलीं.

विजापुरी सरदार बनलेल्या शहाजीला जागीरीची व्यवस्था लावतांना एका फार चांगल्या मनुष्याची जोड मिळाली होती. तो म्हणजे दादाजी कोंडदेव मलठणकर. रचनात्मक कार्य करण्याची शक्ति, न्यायबुद्धि, करारीपणा, इत्यादि गुणांची याच्या ठिकाणीं परिसीमा झाली होती. रायाराव ह्या नष्टकर्म्यानें शहाजीच्या जागीरींत पुण्यासारख्या गांवावर गाढवाचे नांगर फिरवून मुलूख ओस पाडला तर या पुण्यकर्म्यानें सोन्याच्या फाळानें जमिनी नांगरविल्या व तोच मुलूख वहितीस आणून आबादानी केली. याचे न्यायनिवाडे तर इतके प्रसिद्ध, इतके समतोल व इतके पुराव्यावर आधारलेले असत कीं, त्यांत कोणीही बोट शिरकवूं शकत नसे. सर्व लोक त्यांवर डोळे मिटून विश्वास ठेवीत व हर-लेले लोकांसहि कुरकुरीस जागा रहात नसे. करारीपणा असा कीं, एकदां कोणाशीं अन्याय्य वर्तन केलें असें वाटल्यावरून हा जन्म-भर दीड बाहीचा अंगरखा वापरीत राहिला अशी आख्यायिका आहे. पहिला बाजीराव व चिमाजी अप्पा यांस आलेल्या एका पत्रांत शाहूचे याजविषयीं उद्‌गार आहेत ते असे– 'दादाजी कोंडदेव लहानसाच ब्राह्मण झाला. परंतु त्यानें जे इन्साफ केले ते अवरंग-जेब पातशाहासही वंद्य जाहले. यावरून दादाजीनंतर सुमारें शंभर वर्षांनीं लोकांत त्याजविषयीं कशा प्रकारची कल्पना होती हें समजतें (पेद १७।५२).

असा हा मनुष्य इ. १६३६ पासून इ. १६४७ मध्यें मरेतों शहाजीच्या नोकरींत होता. एका आदिलशाही फर्मानांत त्यास

शहाजीचा मुतालीक अर्थात् प्रतिनिधि किंवा कारभारी म्हणून संबोधिलें असलें तरी अनेक महजरांत त्याचा हुद्दा सुभेदार नाम-जाद किले कोंढाणा व महालानिहाय असा आला आहे. तेव्हां त्याची मुतालिकी विजापूरच्या आदिलशाहीस मान्य होती येवढेंच नव्हे तर कोंढाण्यास स्वतंत्र हवालदार असून त्यावर व भोवता-लच्या प्रदेशावर याची सत्ता चाले. तशी सत्ता चालविण्याचा त्यास खास अधिकार होता असें दिसतें. इ. १६४४–४५ मध्यें आदिल-शाही इतराजीमुळें शहाजीच्या जागीरीवर स्वारी करण्यांत आली तिचा हेतु दादाजी कोंडदेवास नामोहरम करण्याचा होता. तेव्हां तो सरकारमान्य नोकर असला तरी शहाजीशीं पक्का एकनिष्ठ होता याविषयीं शंकाच नाहीं. या स्वारीचा निकाल कसा लागला हें नीट समजत नसलें तरी एव्हां विजापूरकरांतर्फे आलेल्या घोर-पडे सरदारद्वयांस मार खाऊन परतावें लागलें असें शिवभारता-वरून म्हणतां येतें. दादाजी कोंढाण्याचा मुद्दाम नेमलेला सुभेदार असला तरी किल्ला आदिलशाही हवालदाराच्या ताब्यांत होता. दादाजी जिवंत असे तोंवर शिवाजीनें हा किल्ला स्वतःच्या खास कबज्यांत आणण्यासाठीं विशेष खटपट केली नाहीं. पण इ. १६४७ मध्यें दादाजी कोंडदेवाचा अंत होतांच बहुधा कोंढाण्याच्या दक्षिणे-कडील खेड–शिवापूरच्या आसपासच्या भागाचा देशपांडे बापूजी मुद्गल नऱ्हेकर यानें तेथील किल्लेदारास वश केलें आणि अचा-नकपणें गड शिवाजीच्या ताब्यांत आला (ऐफासा १।४८; शिभा १३।४३–४५; शिचप्र ५५).

हा गड यापुढें कायमचाच महाराजांच्या ताब्यांत राहिला असता. पण इ. १६४९ मध्यें शहाजीवर विजापूरच्या मुहम्मद आदिलशाहाची पुन्हा इतराजी होऊन त्यास कैद करण्यांत आलें. आणि तिकडे बंगलूर येथें असलेला महाराजांचा थोरला भाऊ संभाजी याजवर आणि इकडे शिवाजीमहाराजांच्या ताब्यांत अस-लेल्या पुरंदर-सिंहगडाच्या आसमंत भागावर विजापूराहून स्वाऱ्या झाल्या. या दोन्ही स्वाऱ्यांत विजापूरकरांचा पराभव झाला तरी तेवढ्यानें शहाजीची सुटका होण्यासारखी नव्हती. शेवटीं शहा-

जीनें उपर्युक्त तिन्ही ठिकाणें मुलांकडून परत करवितों म्हणून कबूल केलें. हीं ठिकाणें परत दिलीं तरच आपल्या वडिलांची सुटका होईल हें दोघा भावांस कळून चुकलें. तेव्हां शहाजीचा निरोप आल्यावर संभाजीनें बंगलूर व महाराजांनीं पुरंदर-सिंहगड हीं ठिकाणें सोडून दिलीं आणि शहाजीची सुटका झाली. या वेळीं सिंहगड ताब्यांत घेण्यासाठीं विजापुराहून बहुधा दिवाण मिया रहीम मुहम्मद हा आला होता. त्याप्रमाणें त्याच्या ताब्यांत सिंहगड, शिरवळ परगणा व बारा मावळें गेलीं असें दिसतें. (शिचवृसं २।२७–२९; शिचप्र ५५; पुद ३।१३१; शिभा १५।५१–५३; शिचसा १।८२).

एव्हां कोंढाणा विजापूरकरांच्या ताब्यांत आला खरा; पण तो त्यांना फार दिवस पचला नाहीं. शहाजीस बंगलूरच्याही खालीं नवीन जागीर मिळाली. ती नवी जागीर व बंगलूरकडील जागीर यांच्या व्यवस्थेसाठीं तो तिकडे कायमचाच वस्ती करून राहिल्याप्रमाणें झाला. अर्थात् इकडील जागीरीशीं असलेले त्याचे संबंध हळूहळू दुरावत जाऊन इ. १६५६ च्या सुमारास ते अजीबात तुटले आणि महाराज या जागीरीचे पूर्ण मालक बनले. हे संबंध तुटण्याच्या अगोदर कांहीं दिवस मुहम्मद आदिलशाह अर्धांगासारख्या तीव्र व चेंगट दुखण्यानें आजारी पडला व दरबारांत हिंदुविरोधी व हिंदुपक्षपाती असे दोन तट पडले. या परिस्थितीचा फायदा घेऊन महाराजांनीं कित्येक गड कोणत्या ना कोणत्या उपायानें आपल्या ताब्यांत आणले व त्यांस नवीं नावें दिलीं. तेव्हांच कोंढाणाही हस्तगत करून त्यास सिंहगड हें नांव दिलें असावें (शिचप्र ५०).

तान्हाजीप्रसंग घडण्यापूर्वीच कोंढाण्यास सिंहगड हें नांव असल्याचा कागदोंपत्रीं पुरावा असून ही माहिती 'गड आला पण सिंह गेला' ही कै. ह. ना. आपटे यांची लोकप्रिय कादंबरी प्रकाशित होण्यापूर्वी सर्वत्रांस परिचित होती. ती कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर मात्र अलीकडे सर्वसामान्य लोकांची अशी समजूत झाली आहे कीं, तान्हाजीच्या प्रसंगानंतर या गडास सिंहगड हें

नांव मिळालें. पण ही समजूत खरी नाहीं. इ. १६६३ मार्च अखेरीस गडावर कांहीं फितवा झाल्याचें कळल्यावरून महाराजांनीं कोंकणांत नामदारखानावर जाण्याचा बेत रद्द केला आणि लष्करी लोक व खासखेली हशम यांसह सिंहगडावर जाऊन तेथें खबरदार असावें, फितव्याची चौकशी करून तिचें वृत्त महाराजांस सादर करावें, फितूर झालेले लोक काढून त्या जागीं बरोबर नेलेले लोक नेमावे, इत्यादि आज्ञा मोरोपंत पेशवे व निळोपंत मुजुमदार यांस दिल्याचें ता. ३।४।१६६३ च्या पत्रांत नमूद आहे (रा८।१२).

पुण्यामध्यें महाराजांनीं स्वतःसाठीं बांधलेल्या लाल महालांत मुक्काम ठोकून राहिलेला आणि औरंगजेबाकडून आलेला सुभेदार शायिस्तेखान यावर त्यांनीं इ. १६६३ एप्रिल ५ या तारखेस रात्रीं छापा घालून त्याची दुर्दशा कशी उडविली हें सर्वांस ठाऊक आहे. हा छापा घालण्यासाठीं ते सिंहगडाहून आले व छाप्याचें काम संपल्यानंतर महाराजांनीं सिंहगडासच प्रयाण केलें; एवढेंच नव्हे तर महाराजांचा पाठलाग करण्यासाठीं आलेल्या सैन्याची महाराजांनीं येथूनच धुळधाण उडविली अशी कल्पना आहे. पण मागें जी हकीगत दिली आहे तिचा विचार करतां शायिस्तेखानावरील छाप्यासाठीं महाराज आणखी कोठून तरी आले असावे. मात्र परततांना कर्यात मावळांत म्हणजे मुठें खोऱ्यांत गेले अशी नोंद आहे (शिचप्र २२; मराचि २११).

शायिस्तेखानाची अशी फजीति झाल्यावर औरंगजेबानें त्यास परत बोलाविलें आणि त्याच्या जागीं जशवंतसिंह राठोड यास नेमिलें. त्याप्रमाणें जशवंतसिहानें दक्षिणेंत येऊन या वर्षाच्या नोव्हेंबर–डिसेंबरमध्यें सिंहगडास वेढा घातला. हा वेढा सहा सात महिने चालला होता. त्यांत इ. १६६४ एप्रिल १४ रोजीं जशवंतसिंहावर अचानक हल्ला करण्यांत आला. याचा परिणाम असो किंवा त्यास सुभेदारीवरून परत बोलविल्यानें असो, या वर्षी मे २० रोजीं जशवंतसिहानें आपल्या तोफा गडाखालीं उतरविल्या व मे २८ रोजीं वेढा उठविला. तेव्हां महाराज ताबड-

तोब मे ३० रोजीं व्यवस्था पाहण्यासाठीं सिंहगडास गेले होते (शिचप्र २२, ५९, ५१, ४६, ६०).

जशवंतसिंह येथून परतल्यावर त्याच्या जागीं जयसिंह आला. शिवाजीस नेस्तनाबूद करण्याविषयीं यास औरंगजेबाचे सक्त हुकूम होते आणि जयसिंहास आपण हें काम करूं शकूं अशी उमेद होती. त्यानें येऊन पुण्यासच मुक्काम ठोकला आणि चढाईचें काम खूप जोरानें सुरू केलें. त्याच्या हाताखालचा एक अधिकारी दाउदखान शिवापुराहून कोंढाण्याच्या बाजूस गेला आणि त्यानें इ. १६६५ मे १ रोजीं ती बाजू उद्ध्वस्त केली. पण हें केवळ सूतोवाच होतें. यानंतर पुढें कित्येक दिवस मोगली सैन्यानें मावळ भाग उजाड पाडण्याची अविश्रांत खटपट करून अगणित गुरेंढोरें व मालमत्ता हस्तगत केली. एवढेंच नव्हे तर हा किल्ला हस्तगत करण्यासाठीं इतरांप्रमाणें यासही वेढा घातला. लवकरच महाराजांच्या लक्षांत आलें कीं, या वेळीं जयसिंहाशीं सामोपचारानें तह करणेंच युक्त आहे. त्या योगें थोडा तरी प्रदेश आपल्या ताब्यांत राहील. विरोध केला तर सर्व प्रदेश व किल्ले हातचे जाण्याचा प्रसंग आल्याशिवाय राहात नाहीं; मग आपण व मुलेंमाणसें यांस राहाण्यासही जागा उरणार नाहीं. तेव्हां त्यांनीं जयसिंहाशीं तह केला. या तहांतील अटींप्रमाणें सिंहगडासह तेवीस किल्ले शिवाजी महाराजांनीं जयसिंहाच्या ताब्यांत दिले. अटींनुसार किल्ला ताब्यांत घेण्यासाठीं जयसिंहानें आपला मुलगा कीरतसिंह यास महाराजांबरोबर सिंहगडास पाठविलें. त्यानें तो किल्ला प्रथम स्वतःचे ताब्यांत घ्यावयाचा आणि नंतर तो त्यासाठीं नेमलेला किल्लेदार शाहिदखान याच्या ताब्यांत द्यावयाचा असें ठरलें होतें. त्याप्रमाणें हा किल्ला इ. १६६५ जून १४ रोजीं कीरतसिंहाच्या ताब्यांत आल्यावर इ. १६६५ सप्टेंबर २१ रोजीं जयसिंह जातीनें तेथें गेला, एक रात्र तेथें राहिला आणि तेथील सर्व व्यवस्था पाहून व आवश्यक त्या सूचना देऊन दुसरे दिवशीं परत आला. पुढें महाराज आग्र्याच्या प्रसंगांतून सुटून सुखरूप परत आले. नंतर औरंगजेबाशीं तह झाला तरी तो किल्ला मोगलांनीं घेतल्यापासून तब्बल चार वर्षं त्यांच्याच

ताब्यांत राहिला (शिचवृसं ३।३२, ३७. सरकार–शिवाजी अँड हिज टाइम्स, चौथी आवृत्ति, पृ. १२४).

पण महाराजांनीं तह मोडून महाराष्ट्रांतील एकेक किल्ला मोगलांच्या कचाटयांतून सोडविण्यास प्रारंभ केला. आणि इ. १६७० फेब्रुवारी ४ या दिवशीं बहुधा प्रथम सिंहगडावर झडप घातली. हा किल्ला महत्त्वाचा असल्यामुळें याची व्यवस्था उदेभान राठोड या किल्लेदाराच्या आधिपत्याखालीं उत्तम ठेविली होती. किल्ल्यास जेथें उभ्या कडयाचा नैसर्गिक तट नव्हता तेथें भक्कम तट बांधून गड सर्व बाजूंनीं अगम्य केला होता. दोन्ही दरवाजांवर पहारे असल्यामुळें तेथून शत्रुसैन्यास प्रवेश मिळणें शक्यच नव्हतें. असा किल्ला घेण्यासाठीं शौर्य, धैर्य, युक्ति, शक्ति इत्यादि गुणांनीं युक्त असा मातबर मनुष्य निवडणें अवश्य होतें. तानाजी मालुसरे हा या कामास सर्वस्वीं योग्य आहे असें वाटून शिवाजी महाराजांनीं त्याची निवड केली.

तानाजीविषयीं विश्वसनीय अशी फारशी माहिती उपलब्ध नाहीं. ऐकीव माहिती ठाऊक आहे. ती थोडक्यांत अशी :— हा मूळचा सातारा जिल्ह्यांतील जावळी तालुक्यापैकीं पांचगणी गांवाच्या पूर्वेस सुमारें दोन मैलांवर असलेल्या गोडोली गांवाचा राहणारा. कुलाबा जिल्ह्यांतील महाड तालुक्यांत सह्याद्रीचा एक फाटा घुसला असून त्याच्या दक्षिणेस प्रतापगड तर उत्तरेस चंद्रगड आहे. या फाटयाच्या पायथ्याशीं उमराठें नांवाचें खेडें आहे. कांहीं कारणानें तान्हाजी या गांवीं येऊन राहिला होता. वरील भागांत दरोडे घालणाऱ्या व दंगे करणाऱ्या कोळी लोकांचा बंदोबस्त करण्याचें काम महाराजांनीं त्याजवर सोपविलें होतें व त्याच्या मदतीस येसाजी कंकाची योजना केली होती (भूभ्र ६८).

शिवभारतांत याच्या कर्तबगारीविषयीं किंवा पूर्वचरित्रात्मक थोडी अधिक व विश्वसनीय माहिती आली आहे. अफजलखानास मारतांच नगाऱ्याचा इशारा झाल्याबरोबर महाराजांच्या पायदळाचे पांच सरदार एकेक हजार पायदळ घेऊन त्याच्या सैन्यावर तुटून पडले. त्यांपैकीं तानाजी मालुसरे हा एक सरदार होता.

महाराजांनीं दाभोळ, पाली, प्रभानवल्ली, शृंगारपूर, चिपळूण, संगमेश्वर इत्यादि ठिकाणांवर केलेल्या स्वारींत पायदळाचा अधिपति योद्धा तानाजी मालुसरे होता; येवढेंच नव्हे तर शृंगारपूरचा राजा सूर्याजीराव याशीं झालेल्या लढाईंत तान्हाजी प्रमुख होता. या वेळीं कोकणचा सुभेदार पिलाजी नीळकंठराव होता. सैन्यासह याचा मुक्काम संगमेश्वरास असतां मध्यरात्रीच्या वेळीं सूर्याजीरावानें यांजला वेढिलें. पिलाजी घाबरून पळूं लागला. तेव्हां तानाजीनें त्याचा धिक्कार करून त्यास मदतीचें आश्वासन तर दिलेंच; पण त्यानें पळून जाऊं नये म्हणून त्यास दगडास बांधून ठेविलें. रात्रभर लढाई दिल्यानंतर सकाळीं शृंगारपूरकर पळून गेला. नंतर दुसऱ्या दिवशीं महाराज राजापुराहून परत येत असतां तानाजी महाराजांस सामोरा गेला आणि महाराजांनीं त्याचा पराक्रम ऐकून त्याचा सन्मान केला (शिभा २२।२, २९।८२, ३०।३८–५१, ३१।१–३).

ही झाली त्याच्या पूर्वचरित्राची समकालीन साधनांत आलेली माहिती. पण खुद्द सिंहगड कसा घेतला याविषयीं या साधनांत अगदींच तोकडी माहिती आली आहे. जेधे व शिवापूरकर देशपांडे अशा दोन शकावलींत मिळून तान्हाजी मालुसरे याजबरोबर जेध्यांकडील व मावळे लोक निवड करून दिले होते. तानाजी हशमांचा सुभेदार होता. तसेंच तो व कोंढाण्याचा किल्लेदार उदेभान दोघेही मारले गेले आणि श. १५९१ माघ वद्य ९ शुक्रवार रोजीं कोंढाणा महाराजांच्या ताब्यांत आला एवढीच काय ती माहिती आली आहे (शिचप्र पृ. २४, ६१).

म्हणून या प्रसंगाचें कथन करण्यासाठीं पोवाडा व बखरी यांचा आश्रय घ्यावा लागतो. जवळजवळ समकालीन अशा सभासदी बखरींत हा प्रसंग वर्णिला आहे तो असा:– पुढें २७ गड मोगलास दिले ते मागती घ्यावे ही तजवीज केली. मोरोपंत पेशवे व निळोपंत मजमदार व अणाजीपंत सुरनीस यांसी सांगितलें कीं, 'तुम्ही राजकारण यत्न करून किल्ले घ्यावे' आपण राजियांनीं मावळे लोकांस सांगितलें कीं, 'गड घेणें'. त्याजवरून तानाजी माल-

सुरा म्हणून 'हजारी मावळियांचा होता त्यानें कबूल केलें कीं, 'कोंडाणा गड आपण घेतों.' असें कबूल करून वस्त्रें, विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडाखालीं गेला आणि दोघे मावळे बरे, मर्दाने निवडून रात्रीं गडाच्या कड्यावरून चढविले, जैसे वानर चालून जातात, त्याचप्रमाणें कड्यावर चालून गेले आणि कडा चढून गडावर जाऊन तेथून माळ लावून वरकड लोक देखील तानाजी मालसुरा चढून गडावरी तीनशें माणूस गेले. गडावरी उदेभान रजपूत होता. त्यास कळलें कीं, गनिमाचे लोक आले. ही खबर कळून कुल रजपूत कंबरबस्ता होऊन, हातीं तोडाबार घेऊन, हिलाल, चंद्रजोती लावून बाराशें माणूस तोफेची व तिरंदाज, बरचीवाले, पटाईत, सुऱ्या, आडहत्यारी, ढाला चढवून चालोन आले. तेव्हां मावळे लोकांनीं 'श्रीमहादेव!' असें स्मरण करून नीट फौजेवर रजपुतांचे चालून घेतलें. मोठें युद्ध एक प्रहर झालें. पांचशें रजपूत ठार झाले. चाळीस पन्नास मावळे ठार जाले. उदेभान किल्लेदार खासा त्यास व तानाजी मालसुरा सुभेदार यासि गांठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर, एक एकांवर पडले. वार करीत चालले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग तानाजीनें आपले डावे हाताची ढाल करून त्याजवरी वोढ घेऊन, दोघे महारागास पेटले. मोठें युद्ध केलें. एकाचे हातें एक तुकडे होऊन फिरंगीच्या वारें पडले. दोघे ठार झाले. मग सूर्याजी मालसुरा, तानाजीचा भाऊ, यानें हिंमत धरून, कुल लोक सांवरून, उरले रजपूत मारिले. कित्येक रजपूत कडे उडोन पळोन मेले. असें बाराशें माणूस मारिलें. किल्ला काबीज केला आणि गडावर पागेचे खण होते त्यांस आग लाविली. त्याचा उजेड राजियांनीं राजगडाहून पाहिला आणि बोलले कीं, "गड घेतला. फत्ते झाली!" असें जाहालें. तों जासूद दुसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं, "तानाजी मालसुरा यांनीं मोठें युद्ध केलें. उदेभान किल्लेदार यास मारिलें आणि तानाजी मालसुराही पडला" असें सांगितलें. गड फत्ते केला. असें सांगतांच राजे म्हणू लागले कीं, "एक

गड घेतला, परंतु एक गड गेला ! " असे तानाजीसाठीं बहूत कष्टी जाहाले. पुढें गडावरी ठाणें घातलें. सूर्याजी मालसुरा भाऊ नांवाजून त्याचा सुभा त्यास सांगितला. धारकरी लोकांस बक्षिसें सोन्याचीं कडीं दिलीं. द्रव्य अपार दिलें. वस्त्रें जरी कुल लोकांस दिलीं. ये जातीनें प्रथम कोंडाणा घेतला (चौथी आवृत्ति, पृ. ५३–५५).

पोवाड्यांत थोडी निराळी माहिती आली आहे. ती सर्व विस्तारानें येथें देण्यांत स्वारस्य नाहीं. तिचा सारांश असा:– सिंहगड आपल्या ताब्यांत असावा असें वाटून जिजाबाईनें ती गोष्ट शिवाजी महाराजांपाशीं काढली. त्यांनीं या कामावर उमराठ्याच्या तान्हाजी मालुसऱ्याची नेमणूक केली. त्याच वेळीं तान्हाजीचा मुलगा रायबा याच्या लग्नाचा मुहूर्तनिश्चय झाला होता. पण तान्हाजी लग्न तसेंच सोडून आला. त्याजबरोबर मामा शेलार व भाऊ सूर्याजी होते. प्रथम त्यानें मेटावरच्या कोळ्यांच्या साह्यानें सिंहगडाची माहिती काढिली आणि घोरपड व दोर यांच्या साहृयानें तो सिंहगडाचा कडा चढून गेला. तेथें त्यानें चंद्रावळी हत्ती, सिद्दी हिलाल, उदेभानाचे बारा मुलगे व ९०० पठाण यांस मारलें. पण उदेभानानें तान्हाजीस मारलें. शेलारमामानें उदेभानास ठार केलें. नंतर कल्याण दरवाजानें सूर्याजी वर आला व त्यानें बाकीच्या ९०० पठाणांस ठार केलें. शिवाजी महाराजांस हें समजल्यावर ते स्वतः उमराठ्यास गेले, रायबाचें सांत्वन करून त्याचें नव्या नवरीशीं लग्न लाविलें, त्यास डोणजें गांव व मालुसऱ्याचा दंड इनाम देऊन तान्हाजीची सरदारकी दिली (केळकर–ऐतिहासिक पोवाडे पृ. ३१–६३).

या पोवाड्यांत गेट–ग्याट असा इंग्रजी शब्द आला आहे आणि मंडईच्या वाड्यांत पट्टी भरणें, चांदवडी रुपया, मंडईचा बाजार हे उत्तर पेशवाईतच रूढ असूं शकणारे पदसमूह आहेत. शिवाय एकंदर शब्दरचना, कथावर्णन इत्यादींत इतकी अस्वाभाविकता, अतिशयोक्ति वगैरे दोष आहेत कीं, हा पोवाडा रचणारा शाहीर तुळशीदास समकालीन असणें शक्य नाहीं. येवढेंच

नव्हे तर तो निश्चयानें उत्तर पेशवाईंतील व कदाचित् अव्वल इंग्रजींतील असून पोवाडा रचतांना त्यानें घटना कशी घडली याची फारशी चौकशीही केली नसावी. यामुळें बखरी व यांतील माहिती यांत पुष्कळ तफावत पडली आहे. म्हणून यांतील माहिती कोणती व कितपत खरी मानावयाची हा प्रश्नच आहे. आणि त्यांतल्या त्यांत घोरपडीच्या साह्यानें कडा किंवा तट चढून जाणें ही सामान्यतः मोठी करामतीची बाब समजली जाते. म्हणून खरोखरच तान्हाजी सिंहगड कसा चढून गेला हा महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न झाला आहे. बहुधा प्रचलित पोवाड्यामुळें झालेली समजूत अशी कीं, तो घोरपडीच्या साहृयानें सिंहगडाचा कडा चढला.* पण ही घटना पुराव्याच्या निकषावर घासली असतां टिकत नाहीं. समकालीन पुराव्यांत तान्हाजीच्या कृत्याविषयीं तपशील नाहीं. शिवाजीची माहिती देणाऱ्या आठ बखरी असून त्यांपैकीं शिवाजीस अगदीं जवळची बखर जी सभासदी तिचा उतारा वर दिला आहे. त्यांत घोरपडीचा निर्देश नसून वानराप्रमाणें कडा चढून माळा लावल्या व तटावर गेले असा आशय आहे. प्रायः याचाच अनुवाद सप्तप्रकरणात्मक चरित्र (पृ. ७८), चित्रगुप्त (पृ. ७६) व शेडगांवकर (पृ. ५८) या बखरींत आहे. सच मध्यें सिंहगड नांव तानाजीनंतर ठेविलें येवढा मजकूर अधिक आहे. बाकी बखरींत सिंहगड–तान्हाजी प्रकरण नाहीं. तेव्हां कोणत्याही बखरींत घोरपडीची हकीकत नाहीं. [इ. १८९१ मध्यें पोवाडा प्रसिद्ध होईपर्यंत मराठी इतिहासावर जेवढीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं त्यांपैकीं एकांतही घोरपडीची हकीकत नाहीं. उदाहरणार्थ ग्रंट डफ ही हकीकत देत नाहीं. भिडेकृत सातारचे श्रीमंत छत्रपति शिवाजी महाराज.... इतिहास (प्रकाशन काल इ. १८६६), भागवतकृत 'शिवछत्रपतींचें चरित्र (प्र. का. इ. १८८९) या पुस्तकांत ही हकीकत नाहीं. येवढेंच

* मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास परिशिष्टें पृ. १३–१७ वर एक जुना कागद छापला असून त्यांत कर्णसिंह व त्याचा मुलगा भीमसिंह यांनीं घोरपडीच्या साह्यानें मनुष्यें कड्यावर चढवून किल्ला कसा हस्तगत केला हें सांगितलें आहे. पण त्या कागदाचें प्रामाण्य संशयातीत नाहीं.

काय पण पोवाड्याच्या प्रसिद्धीनंतर पांच वर्षांनीं म्हणजे इ. १८९६ मध्यें प्रकाशित झालेल्या 'व्ही. एस. चे मार्मिक व ऐतिहासिक लेख द्वितीय गुच्छ' यांतही घोरपडीच्या कथेचा स्वीकार केलेला दिसत नाहीं. किंकेड व पारसनीस यांच्या 'ए हिस्ट्री ऑफ दि मराठा पीपल' या इ. १९१८ मध्यें प्रकाशित झालेल्या त्रिखंडात्मक पुस्तकांत ग्रंथगर्भामध्यें घोरपडीच्या कथेचा स्वीकार केला असला तरी तळटीपेंत सभासदी बखरींतील कथन कमी रोमहर्षक पण अधिक संभाव्य, असें नमूद केलें आहे. श्री. जदुनाथ सरकार यांनींहि आपल्या शिवचरित्राच्या पुस्तकांत घोरपडीच्या हकीकतीचा स्वीकार केलेला नाहीं. तात्पर्य घोरपडीची हकीकत फक्त पोवाड्यांत आहे; पण तो पश्चात्कालीन असल्यामुळें त्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं. तेव्हां नवीन विश्वासार्ह पुरावा मिळेतों घोरपडीची कथा कल्पित समजली पाहिजे.

तान्हाजी घोपरडीच्या साह्यानें कडा न चढतां माळा लावून चढला असें सभासदी बखर सांगते. माळा लावणें म्हणजे दोराची शिडी लावणें असा अर्थ असावा. पण कोणी तरी प्रथम वर चढून गेल्याविना माळ तरी कशी लावतां येणार? म्हणून प्रथम दोन माणसें वर चढलीं. खनें कच्या खांद्यावर, गनें खच्या खांद्यावर, घनें गच्या खांद्यावर अशी माळ लावून चढून जाणें असाही माळेचा अर्थ असावा. अशी माळ तीन किंवा चार पुरुषांपलीकडे जाणार नाहीं. अशा तऱ्हेनें चढलेला कडा तो खांदकडा असा अर्थ असल्यास तो डोणजे दरवाजाच्या पूर्वेस थोड्या अंतरावर आहे. विठोजी कारक्यानें या कड्याजवळच शिड्या लाविल्या. पण मग तान्हाजी चढला तो कडा हा नसावा. तान्हाजी बहुधा पश्चिम बाजूनें कल्याण दरवाजा सहज हस्तगत करतां येईल अशा बेतानें कडा चढला असावा. कागदपत्रांच्या पुराव्याच्या अभावीं यापेक्षां अधिक कांहींच सांगतां येण्यासारखें नाहीं.

या वेळीं सिंहगड महाराजांच्या ताब्यांत आला तो अव्याहत संभाजीच्या वधापर्यंत मराठ्यांच्याच ताब्यांत होता. बहुधा इ.

१६७१ मध्यें महाराजांनीं या गडाच्या बांधणीसाठीं दहा हजार होन खर्च केले अशी एक नोंद आहे. मध्यंतरीं महाराजांच्या मरणापूर्वीं दीड वर्ष संभाजी रुसून दिलीरखानाकडे गेला तो येथूनच असें विजापूरच्या बसातीनुस्सलातीन या इतिहासग्रंथांत नमूद आहे तर जेधे शकावली तो परळीहून दिलीरकडे गेला असें सांगते (रा. ८।२२; शिचवृसं २।१०; शिचप्र २९).

ता. ११।३।१६८९ रोजीं संभाजीस मारल्यानंतर औरंगजेबानें महाराष्ट्रांतील सर्व किल्ले हस्तगत करण्याची एक मोहीमच काढली. तीस प्रत्युत्तर म्हणून संताजी घोरपडे, त्याचे दोन भाऊ आणि विठोजी चव्हाण यांनीं एक मोठें साहस केलें. औरंगजेबाची छावणी तुळापुरा (वढू–कोरेगांव)स असतां रात्रीच्या वेळीं छापा घालून त्यांनीं त्याच्या तंबूच्या तणावा तोडल्या व कळस कापले. हें कृत्य करून ते सिंहगडाच्या झाडींत आले. तेव्हां सिंहगडावर प्रतापराव गुजराचा लेक सिधोजी किल्लेदार होता. त्यानें त्यांची बरदास्त ठेविली व जखमी लोकांस किल्ल्यावर नेलें (संभाजी-राजाराम चरित्रें ४ थी आवृत्ति पृ. ४७; ऐलेपयाव ३=४०६).

पण यानंतर एकामागून एक महाराष्ट्रांतील बहुतेक किल्ले औरंगजेबानें घेतले. तेव्हां इतरांबरोबर हाही त्याच्या ताब्यांत गेला. रामचंद्रपंत अमात्यानें कान्होजी झुंजारराव मरळ देशमूख यास हा व राजगड हे किल्ले हस्तगत करणें व इतर कार्यें करण्यास इ. १६९० जुलै ३ च्या एका पत्रानें सांगितलेलें दिसतें. तरी एव्हां हा मोगलांकडून सुटला नाहीं (रा १६।२७).

पण मराठे कांहीं स्वस्थ बसले नव्हते. आपल्या नेमणुकीप्रमाणें पुण्याकडे शंकराजी नारायण व धनाजी जाधव आणि कोल्हापूरच्या बाजूस रामचंद्र नीळकंठ व संताजी घोरपडे यांनीं मराठी सेनेची संघटना करून किल्ले परत घेण्याचा उपक्रम सुरु केला. त्याप्रमाणें इ. १६९२ मध्यें शंकराजीनें हा किल्ला हस्तगत करण्यासाठीं लोक पाठविले. त्यांनीं तटास शिड्या लावून किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. पण शत्रू खबरदार असल्यानें अपयश घेऊन

लोकांस परतावें लागलें, सिंहगड, लोहगड, इत्यादि किल्ले औरंगजेबाच्या ताब्यांत राहिल्यानें मराठ्यांस देशावर प्रभावी हालचाली करणें शक्य होईना; येवढेंच नव्हे तर कोकणांतील प्रतिकारांतहि व्यत्यय येई. तेव्हां हरतऱ्हेनें सिंहगड हस्तगत करणें मराठ्यांस आवश्यक होतें. म्हणून इ. १६९३ मध्यें पुन्हा प्रयत्न करण्यांत आला. या वेळीं मराठ्यांकडील पायदळाचा पंचहजारी सरदार नावजी बलकवडे यानें सिंहगड घेण्याचें कबूल केल्यावरून शंकराजी नारायणानें दुसरा एक पंचहजारी सरदार विठोजी कारके यास त्याचा मदतनीस म्हणून नेमिलें. त्याप्रमाणें प्रथम विठोजीनें एकट्यानें आणि नंतर विठोजी व नावजी यांनीं सिंहगडाचा घेरा तपासला व दोघेही राजमाचीस शंकराजी नारायणाकडे परत गेले. त्यांना असें आढळलें कीं, सिंहगड हस्तगत करणें अगोदरच कठीण; त्यांतून गेल्या वर्षाच्या अनुभवानें शहाणे होऊन शत्रूनें डागडुजी, चौक्यापहारे, रात्रीच्या गस्ती आणि अधिक सैन्य यांची व्यवस्था केल्यामुळें गड घेणें अधिकच अवघड झालें आहे. दग्यानें किल्ला घेण्याची सोयच राहिलेली नाहीं. तानाजीस गड घेण्यासाठीं जितके सायास पडले तितकेच एव्हांही पडणें शक्य होतें. म्हणून गड घेतल्यास नावजीला एक इनाम देण्याचें मान्य करण्यांत आलें. या प्रलोभनानें नावजीस मोठा हुरूप येऊन त्यानें तानाजीप्रमाणेंच अचाट पराक्रम करण्याचें ठरविलें. तो ता. २५।६।१६९३ रोजीं सैन्य घेऊन राजमाचीहून निघाला आणि सिंहगडानजीक रानामध्यें दबा धरून बसला. ता. ३० रोजीं निवडक लोकांसह नावजी गडाच्या कड्याखालीं आला. शत्रू सावध असून गस्तीवर गस्ती चालू असल्यानें शिड्या लावणें शक्यच नव्हतें. तेव्हां माळ लावून जमावासह नावजी वर चढला व तटाखालीं गेला. इतक्यांत अरुणोदय होण्याच्या सुमारास विठोजीनें पहाऱ्याजवळ शिड्या लाविल्या. त्यांच्या साहयानें नावजी जमावासह वर चढला आणि पहारे मारून काढून ता. १ जुलै १६९३ इ. रोजीं त्यानें किल्ला हस्तगत केला. तेव्हां कबूल केल्याप्रमाणें नावजीस एक गांव इनाम मिळाला (सा ५।९३७).

इ. १७०२ नोव्हेंबर १९ या तारखेचें व शंकराजी नारायण सचिवाचें एक पत्र आहे. त्यांत सिंहगडच्या कोळ्यांपैकीं रायाजी इतबारराऊ सरनाइक यास सिंहगडाजवळच्या खामगांव खेड्याची खरमरी ही वाडी इनाम दिल्याचें नमूद आहे. इनामाचें कारण इ. १७०२ पूर्वी केव्हां तरी शत्रूकडून किल्ला हस्तगत करतांना यानें एकनिष्ठेनें फार मोठा पराक्रम केला आणि किल्ला शत्रूकडून हिसकावून घेतला हें दिलें आहे. ही हकीकत कदाचित् वरील प्रसंगाच्या वेळची किंवा त्यानंतरची केव्हांचीं तरी असली पाहिजे असें वाटतें (रा. २०।२७४).

यानंतर इ. १७०३ पर्यंत हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत राहिला. संभाजीच्या वधानंतर छत्रपति राजाराम जिंजीकडे निघून गेला होता. पण तिथवर त्याचा पाठलाग झाल्यामुळें व जिंजीस कित्येक वर्षें मोगलांनीं वेढा घातल्यामुळें राजाराम परत महाराष्ट्रांत आला. तेव्हां इकडे हालचालींना जोर चढला. मरणापूर्वी केव्हां तरी धामधूम माजल्यामुळें राजारामानें गुंडोजी जेध्यास जमावासह सिंहगडाकडे पाठविल्याचें एका पत्रांत नमूद आहे. इ. १७०० मार्च ३ रोजीं राजारामाचें देहावसानही याच ठिकाणीं झालें (सं. १।१२५; शिचप्र ६७).

इ. १७०२ डिसेंबर २७ ला औरंगजेबानें या गडास पुन्हा वेढा घातला. तो सुमारें ३–३॥ महिने चालला. या वेळीं गडावर त्र्यंबक शिवदेव मुतालीक व सिदोजी जाधव हवालदार हे प्रमुख असून ते व त्यांच्या हाताखालचे वर्धई, खंडई, लखमई व गणई बेरड यांनीं किल्ला भांडविण्यासाठीं फार मेहनत घेतली. राजाराम–ताराबाईचा मुलगा शिवाजी यानें त्यांस याबद्दल ता. १२।३।१७०३ रोजीं प्रोत्साहनपर पत्र पाठविलें आहे. त्याची इच्छा होती कीं, बेरडांनीं हा किल्ला निदान या सालाचा पावसाळा लागेतों तरी लढवावा. त्यासाठीं त्यानें लोक, पैसा व दारू यांची आवश्यक ती मदतही पाठविली होती. परंतु बेरडांना धीर धरवला नाहीं, त्यांनीं उतावळी केली, तह करून किल्ला सोडला व ते ता. १४।४।१७०३ ला राजगडास निघून गेले. हें वर्तमान शिवाजीस समजतांच

त्यानें त्यांचा निषेध केला आणि त्यांस राजगडावर शंकराजी नारायणाची भेट घेऊन त्याच्या सल्ल्यानें पावसाळा सुरू होईतों मोगलांना खूप त्रास देण्याबद्दल ता. १६।४।१७०३ च्या पत्रानें आज्ञा केली. हा वेढा चालू असतां सिंहगडाचे वतनी सरनाईक खंडोजी व सिदोजी थोपटे यांनीं वेढयांत राहून फार कष्ट केले. म्हणून त्यांस मावळ कर्यातीमधील खामगांव खेड्यापैकीं तीस बिघे जमीन दिल्याची सनद उपलब्ध आहे. (गोमाजी विश्वनाथ पुरंदरे याच्यामार्फत) 'कोंढाणा सला करून घेतला पनास हजार रुपये दिल्हे' अशी ता. १४।४।१७०३ च्या नोंदींत माहिती आली आहे तिची नीट संगति लागत नाहीं. मासिर–इ–आलमगीरीप्रमाणें हा गड हि. १११४ जिल्हेज २ (ता. ८।४।१७०३ इ.) या दिवशीं पडला व त्यास औरंगजेबानें बक्षिदाबक्ष असें फार्सी नांव ठेविलें. तो स्वतः ता. १८।४।१७०३ रोजीं सिंहगड पहावयास गेला असावा (समा १९० शिचप्र ६७, ६८; त्रै ७। ७४,७५; पुद १।२२; माआ मूळ पृ. ४७४).

ता. २८।४।१७०५ पूर्वी अगदीं थोडे दिवस हा किल्ला पुन्हा मराठयांच्या ताब्यांत आला. या वेळीं गड घेण्याची कामगिरी शंकराजी नारायण सचीवानें पंताजी शिवदेवाचे आधिपत्याखालीं त्र्यंबक शिवदेव व रामजी फाटक यांजवर सोपविली होती. त्याप्रमाणें त्यांनीं मेहनत घेऊन किल्ला तर हस्तगत केलाच; पण तेथला मोगली किल्लेदार देवीसिंग यासही कैद केलें. याबद्दल पंताजी शिवदेवास पुण्याच्या पश्चिमेस असलेल्या पौड खोऱ्यांतील शिरवली गांवापैकीं कांहीं जमीन इनाम मिळाली व इतरांस प्रोत्साहनपर पत्रें आलीं. ही हकीकत खरी असेल तर गदाधर प्रल्हाद शकावलींतील 'आषाढ मासीं कोंढाणा माला लाऊन मऱ्हाठियांनीं घेतला' ही नोंद चूक ठरते (त्रै ६।८७,८८; शिचप्र ६८).

यानंतर इ. १७०६ च्या आरंभीं औरंगजेबानें त्याच्या कैदेंत असलेला संभाजीचा मुलगा शाहू यास थोडी मोकळीक देऊन जुल्फिकारखानासह हा गड घेण्यास पाठविलें. त्यांनीं या वर्षी मार्च-एप्रिल

महिन्यांत हा किल्ला मोगलांतर्फे पुन्हा हस्तगत केला. पण या वेळीं द्रव्यप्रयोग करावा लागला (शिचप्र ६९).

केव्हां व कसा हें सांगतां येत नसलें तरी हा गड पुन्हा लवकरच सचिवाच्या ताब्यांत गेला असला पाहिजे. इ. स. १७०२ च्या अखेरीस औरंगजेबानें सिंहगडास वेढा घातला तेथपासून इ. १७०८ मध्यें सचिवाच्या ताब्यांत गड कायमचा जाईतों मराठ्यांनीं ज्या हालचाली केल्या त्यांत सिंहगडचा एक किरकोळ व्यापारी रखमाजी मावजी कुदळे यानें गडावरील मराठ्यांना हरएक जिनसांचा पुरवठा केला. याचा परिणाम म्हणून त्याच्या सर्वस्वाचा नाश झाला. पण इतकें होऊनही त्यानें पुन्हा मराठ्यांस उधार माल पुरविलाच. या कर्जाची फेड म्हणून त्यास खेड व आर्वी या दोन गांवीं मिळून एक चावर जमीन दिल्याचें पत्र उपलब्ध आहे (सं ७।३१; समा २०२).

औरंगजेब मेल्यावर शाहूस पूर्ण मोकळीक मिळाली. तीमुळें येथील सर्वच नूर पालटला. ताराबाईनें स्वातंत्र्याचा लढा चालू ठेवला असला तरी शाहूचा वारसा हक्क कोणासही नाकबूल करतां येण्यासारखा नव्हता. तेव्हां शाहू सुटून महाराष्ट्रांत येतांच येथील मराठे मुत्सद्दी व सरदार यांचीं मनें द्विधा होऊन बाळाजी विश्वनाथ, धनाजी जाधव, सचीव इत्यादि उत्तरेकडील लोक शाहूस तर रामचंद्रपंत अमात्यासारखे दक्षिण प्रांतांतील लोक ताराबाईस मिळाले. अखेर शाहूचा पक्ष जोरदार बनून मिरजेपर्यंतचा बहुतेक प्रदेश त्याच्या ताब्यांत आला. शाहू औरंगजेबाच्या कैदेंतून सुटल्यावर शंकराजी नारायण शाहूस मिळाल्यामुळें त्याच्या ताब्यांत असलेला कांहीं प्रदेश व सिंहगडासुद्धां कांहीं किल्ले इ. स. १७५० पर्यंत विशिष्ट अटींवर तो व त्याच्या पश्चात् त्याचे वंशज यांजकडेच राहिले. यास फक्त एक अपवाद आढळला तो असा : मावळ प्रांतापैकीं सिंहगड, रायगड, प्रचंडगड व विचित्रगड (रोहिडा) यांच्या खालीं असलेले किती तरी गांव खास छत्रपतींच्या अमलाचे होते. त्यांच्या वसुलाचें काम पंतसचीवाकडे असे. इ. १७४२च्या नोव्हेंबर २२ च्या पत्रानें तें काम त्याजकडून काढून विसाजी रघुनाथाकडे दिलें आहे,

तरी तें काम त्याजकडे देण्याबाबत मदत करण्याविषयीं छत्रपतींनीं सिंहगड, रायगड, प्रचंडगड व विचित्रगड येथील किल्लेदारांस पाठविलेलें पत्र उपलब्ध आहे (वैद ४।१७४२।३२).

या येवढ्या मोठ्या काळांत सचिवाच्या शंकराजी नारायण, नारायण शंकर व चिमणाजी नारायण अशा तीन पिढ्या झाल्या. हे तिघे व यांचे अधिकारी यांचे अनेक वेळा सिंहगडास मुक्काम पडत. कौटुंबिक कार्यें होत, मसलती चालत व न्यायनिवाडे दिले जात. यामुळें याचें महत्त्व किंचित्‌ही कमी झालें नाहीं (सं १।१९, ५।७०; रा ६।१९, ३२; १६।५६, ६४, ७९, ८४; पेद२२।३४३,३५१).

इ. १७५० मध्यें या गडाविषयीं एक महत्त्वाची घटना झाली. छत्रपति राजारामाचें सिंहगडावर देहावसान झाल्याचें मागेंच सांगितलें आहे. राजारामाची बायको ताराबाई ही अधूनमधून याच्या समाधीच्या दर्शनासाठीं तेथें जाई. शाहू जिवंत असेतों ही साताऱ्यास प्राय: कैदेंत असली तरी स्वस्थ होती. पण इ. १७४९ च्या अखेरीस शाहू मेल्यावर हिला राज्यलोभ सुटला. यामुळें त्या वेळचा पेशवा बाळाजी बाजीराव व ही यांमध्यें वाकडें येऊन सत्तासंपादनाचे प्रयत्न होऊं लागले. अशा एका प्रयत्नांत तिनें चिमणाजी नारायण सचिवास वश करून घेतलें. या वर्षी ती मेच्या अखेरीस समाधीच्या दर्शनाच्या मिषानें सिंहगडास आली खरी; पण तिचा अंतस्थ हेतु सचिवाच्या साह्यानें कांहीं बखेडा करावा असा होता. ही बातमी पेशव्यास कळतांच त्यानें सचिवास त्याच्या मुलांसह कैद केलें, त्याचा मुलूख जप्त केला, इ. १७५० जून २१ पूर्वी सिंहगडास वेढा घातला आणि इकडे शाहूच्या नंतर त्याच्या गादीवर आलेला छत्रपति राजाराम याजकडे सिंहगड आपणास मिळावा म्हणून आग्रहाची विनंति केली. राजारामानें तो पेशव्यास देण्याविषयीं आज्ञापत्र काढलें. पण पंतसचिवाचे लोक किल्ला सोडीनात. आणि शिवाय छत्रपतीकडून गुप्तपणें खर्चास पैसे व थोडीशीं माणसें असें साह्यही आलें. यामुळें पेशवा अधिकच हट्टास पेटला व वेढ्याचें काम अधिक नेटानें चालू झालें. हा वेढा उठावा म्हणून चिमणाजी नारायण सचीव याची स्त्री भवानीबाई हिनें मोठ्या काकुळतीनें वैद्य

बंधूस लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे. शेवटीं पेशव्यानें मुलखाची अदलाबदल केली. सिंहगड व त्याच्या उत्तरेस असलेली मावळ कर्यात किंवा मुठेचें खोरें पेशव्यानें आपणाकडे घेऊन त्याऐवजीं पुण्याच्या दक्षिणेस असलेला शिरवळ परगणा आणि कांहीं ठिकाणच्या हक्कवसुलीचे अधिकार सचिवास दिले. अशा तऱ्हेनें सचिवास संतुष्ट केल्यावर पेशव्यातर्फे जिवाजी गणेश खासगीवाले यानें सिंहगडाचा ताबा ता. ६।७।१७५० इसवी रोजीं घेतला. वरील कर्यातीची कमावीस पेशव्यानें जिवाजी गणेशासच सांगितली (रा २ पृ. ११२, ११३; रा.६ पृ. ५४; वैद ५।१६७२ शकपैकीं १४).

तदनंतर इ. स. १७५१ च्या मध्यास ताराबाई व पेशवा यांत जीं बोलणीं चालू होतीं त्यांत सिंहगड पेशव्याकडे राहण्याची अट होती (रा ३।१३६; पुद १।३५६);

अशा तऱ्हेनें सिंहगड पेशव्यांच्या ताब्यांत आला तो पेशवाई अखेर त्याजकडेच राहिला. हा गड सामान्यतः दुर्भेद्य असूनही पुण्याच्या अगदीं जवळ असल्यानें खुद्द पेशवे, त्यांचे संबंधी व पुण्याचे इतर महाजन हे या किल्ल्याचा परचक्राचे वेळीं सुरक्षित असें आश्रयस्थान म्हणून उपयोग करीत.[1] यामुळें किल्ल्याच्या पुढील इतिहासाचा मुख्य भाग अशा कृत्यांनींच भरलेला आहे. इ. १७५१ च्या मार्चमध्यें दमाजी गायकवाड गुजराथेंतून साताऱ्यावर चालून जाण्यासाठीं पुण्याजवळ आला असतां ता. ७।३।१७५१ रोजीं सायंकाळीं पुणें पळालें. तेव्हां पेशव्याची आजी राधाबाई व आई काशीताई दुसरे दिवशीं पहाटे सिंहगडास गेल्या होत्या. यांजबरोबर पेशव्याचीं मुलेंमाणसें व इतरही लोक सिंहगडास गेले असतील (रा ६ पृ. ६२).

---

१ पेशवाईंत सुरक्षिततेसाठीं ज्याप्रमाणें या गडाचा उपयोग करीत त्याप्रमाणें मातबर कैदी ठेवण्यासही या गडाचा उपयोग करीत. इ. १७५० नंतर सुमारें ७५ वर्षांच्या काळांत या ठिकाणीं सखाराम बापू बोकील, सखाराम हरी गुप्ते, चिंतो विठ्ठल रायरीकर, रामचंद्र विठ्ठल परांजपे, बाळाराम सुमेरसिंग गार्दी, रघुनाथरावाच्या नाटकशाळा रत्नी व केशरी, आनंदराव दामले, बहिरो रघुनाथ मेहेंदळे, इत्यादि प्रसिद्ध व्यक्ति तेथें कैद ेगीत असल्याचें आढळतें (अका).



छत्रपति राजारामाची समाधि



दारूखाना



वरचा पुणें–होणजें दरवाजा



[illegible]

या वर्षीं जूनच्या ३ तारखेस बाळाजी बाजीराव प्रथमच सिंहगड पहाण्यास गेला; पण कामाच्या गर्दीमुळें त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं तो तेथून परतला असें दिसतें (रा ६ पृ. ६६).

याच वर्षी नोव्हेंबर महिन्यांत निजाम-पेशवे बिघाड झाल्यामुळें निजाम पुण्याजवळ आला. तेव्हां पेशव्याच्या कांहीं चीजवस्तु आणि पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ती सिंहगडास पाठविल्या होत्या (रा ६ पृ. ७३).

इ. १७६२ च्या नोव्हेंबरांत घोडनदी येथें रघुनाथराव व माधवराव पेशवे या चुलत्या-पुतण्यांत लढाई होऊन माधवरावाचा पराभव झाला. या वेळीं रघुनाथरावानें स्वतःचा पक्ष बळकट करण्यासाठीं अनेकांना जागीरी दिल्या. त्यांत सखाराम बापू बोकील याजवर नऊ लक्षांची जागीर व सिंहगड किल्ला अशी मेहरबानी केली (त्रै ५।२५).

इ. १७६३ च्या ऑगस्टमध्यें राक्षसभुवन येथें पेशवे व निजाम यांत मोठी लढाई होऊन तींत निजामाचा पराभव झाला. पण तत्पूर्वी पेशवा औरंगाबाद पावेतों, तर निजाम पुणें-सिंहगडापर्यंत जाळपोळ करीत पोचला होता. यावेळीं सुरक्षिततेसाठीं पेशव्यांपैकीं गोपिकाबाई, तिचा मुलगा नारायणराव व इतर मंडळी पोथ्यापुस्तकें, पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ती, कागदपत्र व इतर संपत्ति यांसह सिंहगडावर गेली होती. या धामधुमींत नारायणरावाचें लग्नही तेथेंच झालें. या वेळीं निजाम केवळ पुणें जाळूनच थांबला नाहीं; तर त्यानें पर्वतीच्या मूर्ती फोडल्या, सिंहगडची माची लुटली, पांच कोटी रुपयांची संपत्ति पोथ्यापुस्तकें, कागदपत्र इत्यादींसह हस्तगत केली आणि कित्येक स्त्रियांच्या इज्जतीही घेतल्या (चंद १।७७; पुद १।१४८; त्रै ६।१०६; रा १४।३०).

नागपूरचा जानोजी भोसले इ. १७६९ च्या आरंभींच जाळपोळ करीत महाराष्ट्रांत येत होता. तो पुण्यास लवकरच येणार अशी फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यांत पुण्यास बातमी आल्यानें येथें एकच पळापळ सुरू झाली. तीन दिवसांत सबंध शहर पळालें. फक्त पांचवा हिस्सा लोक शहरांत राहिले होते.

पार्वतीबाई, रमाबाई इत्यादि पेशवे स्त्रिया व मूल्यवान् सामान सिंहगडास पाठविण्यांत आलें. रघुनाथरावासही रवाना केलें होतें. पण तो वडगांवांतच थांबला. आनंदीबाई गरोदर होती. ती मात्र हट्टानें पुण्यांतच राहिली. पळामुळें ओझें वाहून नेणाऱ्या बैलांचें भाडें वाढून दर बैलास पंचवीस रुपये पडूं लागले. आणि इ. १७५१ मध्यें दमाजी गायकवाड पुण्याजवळून साताऱ्यावर चालून गेला त्या वेळीं घडलेल्या पळाची आठवण झाली (ऐलेसं ३।७९०, ७९१).

इ. १७७१ मध्यें ऐन दसऱ्याचे दिवशीं (११ आक्टोबर) दारूखान्यावर वीज पडल्यामुळें फार नुकसान झालें. दारूखाना तर साफ उडून जळून गेलाच. पण त्यांत गडाचा कारखाननीस बापूजी कमाजी हा मुलेंबाळें व घरदार यांसह पूर्ण नष्ट झाला. दारू ओली होऊं नये म्हणून तिच्या खालीं व भोंवतीं धान्य ठेविलें होतें तेंही जळालें. तसेंच जवळच्या अंबारखान्याचे दोन खण उडून त्यांतील धान्यही जळालें. गणपति, नरसिंह, अमृतेश्वर व रामदासी मठांतील येवढीं देवळें, देवटाकें, गणेशटाकें व अंबारखान्यामागचीं टाकीं, सामान्य व गडद असे दोन्ही अंबारखाने, भातखळचाची कोठी व तिची वाट, डोणजे दरवाजा, त्यावरील बंगला व त्याजवळची घळकी, सरकारवाडा, राजमंदिराची सदर, सदरेपुढील बंगला, शृंगारचौकीची मोरी, जातेंघर, राजमंदिर आणि शिंदे व खानविलकर यांचे पहारे, जागोजागचा तट येवढ्या इमारतींचें कमीअधिक नुकसान झाल्यामुळें सर्वांची डागडुजी करावी लागली. तीसाठीं त्या सालीं ८७०० हून अधिक रुपये खर्च आला (पेद ४५ पृ. ३५; अका).

इ. १७७६ मध्यें सदाशिवराव किंवा भाऊसाहेब यांच्या तोतयाच्या बंडास फार जोर चढला. त्याचा पाठपुरावा करणारा रामचंद्र नाईक परांजपे हा तोतयासह कोकणांतून निरनिराळे किल्ले जिंकीत घाटावर आला व त्यानें सिंहगडही हस्तगत केला. या वेळीं पेशव्यांचा जवाहिरखाना सिंहगडावर होता. त्यांतील रुप्याचीं भांडीं मोडून लोकांस खर्चास दिलें आणि किल्ला तोतयानें

लढविला अशी आणखी माहिती मिळते (इवृ १८३४ पृ. ११९; रा १०।१७६).

सिंहगडावर राजारामाच्या पुण्यतिथीचा दर वर्षी उत्सव होई असें दिसतें. इ. १७८४ मार्च १५ रोजीं पडलेल्या उत्सवाच्या बंदोबस्तासाठीं पुण्याहून ३०–३५ चांगले लोक मागितल्याचें एक पत्र आहे (सं ४।१३).

पहिल्या मराठे–इंग्रज युद्धांत इंग्रज पुण्याच्या जवळ तळेगांवा-पर्यंत आल्यामुळें पुण्यांत पळापळ सुरू झाली. या वेळींही पेशव्याची सर्व महत्त्वाची चीजवस्त पर्वतीच्या सोन्याच्या मूर्तीसह सिंहगडास रवाना झाली होती (भूभ्र ७९).

इ. १७९५ मध्यें पेशवे व निजाम यांमध्यें खर्डे येथें लढाई झाली. तीपूर्वी सावधगिरीचा उपाय म्हणून सरकारचे झाडून सारे कारखाने सिंहगड व पुरंदर येथें पाठविल्याचें ता. १।१।१७९५च्या पत्रावरून दिसतें (रा ९।३५९).

इ. १८०२ मध्यें यशवंतराव होळकरानें दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा पराभव केल्यावर तो पळून सिंहगडास गेला आणि तेथून त्यानें इंग्रजानें चालू केलेल्या सब्सिडियरी सिस्टिमप्रमाणें इंग्रजी सैन्य मराठी राज्यांत ठेवण्यास मान्यता दिली.

बडोद्याहून इंग्रजाला अनुकूल असलेला गायकवाडांचा वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन हा पेशव्याशीं बोलणें करण्यासाठीं पंढरपूर येथें गेला असतां त्याचा ता. २०।७।१८१५ रोजीं खून झाला. याचा आळ इंग्रजांनीं त्रिंबकजी डेंगळे यावर घातला आणि त्यास आपल्या ताब्यांत देण्याबद्दल दुसऱ्या बाजीरावाकडे निकड लाविली. तेव्हां बाजीरावानें त्यास पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केलें. सुमारें एक वर्षानंतर तो इंग्रजांच्या तुरुंगांतून निसटला आणि थोडे दिवस स्वस्थ राहून नंतर त्यानें आपल्या हालचाली सुरू केल्या. या वेळींही इंग्रजांची बाजीराव त्यास अंतस्थ मदत करतो अशी खात्री होतीच. तेव्हां त्यांच्यातर्फे एल्फिन्स्टननें एक महिन्यांत त्रिंबकजीस आमच्या स्वाधीन करावें, तोंवर खात्री पटण्यासाठीं रायगड, सिंहगड, पुरंदर आणि त्रिंबक हे किल्ले आजच्या आज ताब्यांत

द्यावे, नाहीं तर उद्या इंग्रजी फौज पुण्यास वेढा देईल, अशी धमकी देली. तेव्हां बाजीरावानें उपर्युक्त किल्ले इंग्रजांच्या स्वाधीन केले. पुढें त्रिंबकजीबाबत बाजीरावाविषयीं इंग्रजांची संशयनिवृत्ति झाल्यावर ता. १४।६।१८१७ रोजीं किल्ले परत करण्यांत आले (मराठी रियासत उत्तर विभाग ३।४५७, ४६५, ४६९).

इ. १८१७ च्या नोव्हेंबरमध्यें १७तारखेस इंग्रजांनीं पुणें घेतलें. सावधगिरी म्हणून बाजीरावानें सर्व खाजगी दौलतीमधील मूल्यवान वस्तू आणि पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ति सिंहगडास पाठवून दिल्या होत्या. पुणें इंग्रजांच्या ताब्यांत गेल्यावर मोठी लुटालूट होईल या भीतीनें पुण्यांतील अनेक श्रीमंतांनीं आपली संपत्तीही सिंहगडास नेऊन ठेविली. सिंहगड लढविण्याचा प्रसंग येईल या अंदाजानें बाजीरावानेंही सिंहगडाची तरतूद केली होती. यामुळें सिंहगडाविषयीं सर्वांनाच भरंवसा वाटत होता. स्वतः गणपतराव पानसे पुणें पडण्याच्या आदले दिवशीं झालेल्या खडकी-येरवड्याच्या लढाईनंतर दहा तोफा घेऊन सिंहगडास गेला होता. तेव्हां ब्रिगेडियर जनरल स्मिथ याच्या हाताखालच्या एका तुकडीनें कॅप्टन टर्नरच्या आधिपत्याखालीं सायंकाळीं सिंहगडास जाऊन चौदा तोफा हिसकाविल्या. पण त्याचीं तीनशें माणसें मरून सामानाची खराबी झाल्यामुळें मिळालेली लूट घेऊन ता. २१ ला ती तुकडी पुण्यास परतली (रा ४।७५, ७७, ८०, ८१; ब्लॅकर ७५).

या बाबतींत मराठी साधनांत थोडी अधिक व निराळीहि माहिती आहे. ता. ५।११।१८१७ रोजीं खडकीची लढाई झाल्यावर नगरकर, जोशी, वानवळे, अमरचंद, पिदडी व गोरगरीब पळाले. पैकीं श्रीमंत लोक सिंहगडावर आणि गोरगरीब माचीस राहिले होते. पुढें ता. १६ ची येरवड्याची लढाई झाल्यावर सर्व जण कोकणांत जाण्याच्या उद्देशानें मालमत्तेसह खालीं उतरले व डोणज्यास राहिले. दुसरे दिवशीं जावें तों प्रहर रात्रीं (ता. १९।११।१८१७) इंग्रज येऊन पोचले व त्यांनीं तोफा डागल्या. तेव्हां अतिशय गोंधळ उडाला. इंग्रजांनीं लूट केली ती पंचवीस लक्षांची म्हणून पुण्यास वदंता उठली होती. ता. २१ रोजीं सकाळीं

सिंहगडकऱ्यांनीं तोफांची मारगिरी केली. तेव्हां इंग्रजाचें दोन-तीनशें माणूस पडून फार खराबी सरंजामाची झाली. तेव्हां लूट घेऊन माघारे उलटले (रा ४।८३, ८४).

पण पुणें पडलें व अष्टीची लढाई होऊन दुसरा बाजीराव पक्का पराभूत झाला हें ठरल्यावर इंग्रजांकडील जनरल स्मिथच्या हुकुमा-वरून जनरल प्रिट्झ्लर यानें हा किल्ला हस्तगत केला. किल्ल्याच्या उत्तर, पूर्व व दक्षिण तिन्ही बाजूंनीं निरनिराळ्या ठिकाणीं तोफांचे मोर्चे घालून ता. १।३।१८१८ पर्यंत ३६७८ गोळे टाकल्यावर तेथें असलेल्या शिबंदी (यांत ७०० गोसावी व ४०० अरब होते)चा धीर सुटून तिनें शरणागतीचें पांढरें निशाण लाविलें. तेव्हां ता. २ ला त्यांस वैयक्तिक हत्यारें व संपत्ति यांसह निघून जाण्यास परवानगी मिळाली. तेथें एकंदर ६७ तोफा व पुष्कळ दारूगोळा इंग्रजांच्या हातीं लागला. दागिने, जडजवाहिर, नगद, इत्यादि मिळून तर पंन्नास लक्षांची लूट मिळाली असें खुद्द इंग्रज अधिकारीच सांगतात. ऊनटोप्या भरभरून जडजवाहिर आणि दागदागिने लुटून न्यावयाचे व पुण्यास आणून जमेल त्या किंमतीस विकावयाचे हा तेथील अिंग्रजी सोजिरांचा कित्येक दिवस धंदाच चालला होता. या वेळीं एका बांधीव खांबांत एक गणपतीची सोन्याची मूर्ती सांपडली व तिची किंमत पांच लाख रुपये होती असें म्हण-तात. तिचें पुढें काय झालें तें समजत नाहीं; पण पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ति इंग्रजांना लुटींत मिळाल्या होत्या त्या त्यांनीं स्थिरस्थावर झाल्यावर पर्वती संस्थानास परत केल्या. दुसऱ्या बाजीरावानें लाला मणिराम नामक एका परदेशी मनुष्याच्या राधाबाई नांवाच्या मुलीशीं लग्न केलें होतें. या वेळीं ती चीजवस्तु घेऊन सिंहगडास राहात असतां तीही लुटली गेली. या लढाईंत दौलतराव घोरपडे नांवाच्या एका मराठा सरदारानें इंग्रजांतर्फे रसद मारण्याचें काम फार उत्तम तऱ्हेनें केलें अशी एके ठिकाणीं माहिती आली आहे (पुणें गॅझे ३।४४५, पेद ४१।२५२, ब्लॅंकर २३९-२४१)

इंग्रजी आमदनींत पहिलीं थोडीं वर्षें येथें पुरंदराप्रमाणेंच कांहीं इंग्रजांनीं वसाहत केली असावी; पण पुढें येथील वसाहत

उठून जाऊन गड ओसाड बनला आणि येथील इमारती हळूहळू पडून नामशेष झाल्या. इ. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर इतर अनेक गडांप्रमाणें येथील तटबंदीही इंग्रजांनीं जागोजाग पाडून टाकिली. पुढें इ. १८८९ मध्यें टिळक सिंहगडावर गेले असतां तेथील सृष्टिसौंदर्य, हवापाणी, ऐतिहासिक पार्श्वभूमि व पुण्याशीं जवळीक या गोष्टींचा त्यांच्या मनावर अनुकूल परिणाम होऊन त्यांनीं तेथें उन्हाळयांत विश्रांति घेण्यासाठीं बंगला बांधिला. इतरांनींही त्यांचें अनुकरण केल्यामुळें आज तेथें ८।१० बंगले दृष्टीस पडतात. सध्या हा गड भारत सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्यानें व्यवस्थेसाठीं आपल्या ताब्यांत घेतला असून तेथें एक रखवालदार ठेवला आहे आणि शक्त्यनुसार गडाची डागडुजी तें खातें करीत असतें.

वर्णन

सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून निघून पुण्याच्या दक्षिण दिशेनें पूर्वेस गेलेल्या भुलेश्वर फाटयाच्या एका उंच शिखरावर व पुण्याच्या नैर्ऋत्येस मुठा नदीच्या खोऱ्यांत हा किल्ला आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून ४३२२ फूट आणि उत्तरेकडील पायथ्यापासून २३०० फूट आहे. माथ्याची पूर्वपश्चिम लांबी सुमारें तीन हजार फूट आणि दक्षिणोत्तर रुंदी अदमासें दोन हजार फूट आहे. याचा आकार एखाद्या लहान दांडयाच्या कुऱ्हाडीसारखा आहे.

या गडावर जाण्यास मुख्य मार्ग दोन आहेत. पैकीं पहिला पुण्याहून निघून धायरी, खडकवासलें, डोणजें या गांवांवरून गडाच्या पायथ्याशीं असलेल्या आतकर वाडीपाशीं थांबतो. येथवर याची लांबी सुमारें चौदा मैल आहे. नंतर अंदाजें तीन मैलांची सरळ चढण चढल्यावर पुणें किंवा डोणजें दरवाजा लागतो. हा रस्ता पुण्याच्या बाजूनें जवळचा असल्यामुळें फार प्रचारांत आहे. तरीही चढ मोठा असल्यामुळें अशक्त मनुष्यांस त्रासदायक आहे. या मार्गानें जाणाऱ्या मोटारी स्वारगेटापासून सुटून वर्षांतून निदान

सहा महिने तरी डोणजें गांवाजवळ सुमारें बारा मैलांवर थांबतात. तेथून पुढें पायीं जावें लागतें. साधारणतः फेब्रुवारीपासून मोटरी आतकरवाडीस जाऊं लागतात. आतकरवाडींत भाड्यानें खुर्च्याहि मिळतात. दुसरा मार्ग नव्या पुणें-सातारा रस्त्यावर चौदा मैल सहा फर्लांगांवर फुटतो. तेथून हा पश्चिमेकडे शिवापूर व कोंढणपूर गांवांवरून कल्याण गांवाच्या पेठेपर्यंत जातो. तेथून सुमारें दोन मैल सोपी चढण व थोड्या पायऱ्या चढून गेल्यावर कल्याण दरवाजा लागतो. इकडील मोटारीही स्वार गेटावरून निघतात व कोंढणपुरास थांबतात. तेथून कल्याण सुमारें ३ मैल आहे. ही वाट फार सोपी असल्यानें पूर्वी याच बाजूनें फार वावर होत असावा. या दोन मार्गांशिवाय गडाच्या घेऱ्यांत (परिसरांत) आग्नेय आणि वायव्य या दिशांस असलेल्या आर्वी, कोंढणपूर व खामगांव या गांवांवरून गडावर येण्यास पाऊलवाटा आहेत. पण वाट कोणतीही असली तरी तिचा शेवट या दोन मुख्य रस्त्यांत कोठें तरी होतो. दोन्ही रस्ते गुरें–घोडीं जाऊं शकतील इतके रुंद आहेत.

गडाला सर्व ठिकाणीं तटबंदी नाहीं. जेथें बाजू कडे तुटून निसर्गतः सुरक्षित आहे तेथें प्रायः तटबंदी नाहीं. तटबंदी असलेलीं ठिकाणें अशीं—१ गडाचें पूर्व टोक. हें टोक म्हणजे गडाला असलेल्या माचीचा माथा होय. ह्याच्या सर्व बाजूंनीं तटबंदी आहे. पुणें दरवाजा व त्यावरील वाट ह्या माचीच्या माऱ्यांत आहेत. २ पुणें दरवाजाच्या डाव्या बाजूस माचीच्या प्रवेशद्वारापर्यंत व उजव्या बाजूस सुमारें २--२॥ फर्लांग. ३ कल्याण दरवाजाची उजवी बाजू सुमारें दोन फर्लांग ते गडाचें नैर्ऋत्य टोक. या टोकावर मोठा बुरूज असून त्याचे पूर्वेस व उत्तरेस सुमारें १ व ३ फर्लांग. ४ गडाचें पश्चिम टोक. येथेंही मोठा बुरूज आहे. त्याच्या दक्षिणेस व पूर्वेस सुमारें २।२ फर्लांग. या सर्व ठिकाणच्या तटबंदींत तीर, बंदुकीच्या गोळ्या इ. मारण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या शेंकडो जंग्या (लांबट, उभीं भोकें) आणि तोफांच्या गोळ्यांसाठीं खाची असलेले लहान मोठे तेहतीस बुरूज आहेत. पुणें दरवाजाच्या पूर्वेकडील तटबंदींत असलेली खाच सुमारें पन्नास फूट रुंद आहे. एकदम अनेक

तोफांचा मारा करतां यावा म्हणून ही येवढी रुंद ठेवली असावी.या तटबंदीविषयीं दोन वैशिष्टचें आढळतात तीं अशीं—१ तटाच्या आंतून पण जवळून हिंडण्यासाठीं सर्वभर पक्की फरसबंदी वाट आहे. २ जेथें तट नाहीं तेथेंही पक्की पण राडेरोडे घालून केलेली वाट आहे.

गडावर कोणते अवशेष कोठें आहेत हें या पुस्तकांत अन्यत्र दिलेला नकाशा व त्याचा विवर यांवरून ध्यानांत येईल. येथें त्यांचें आवश्यक तेवढें वर्णन देतों.

कल्याण दरवाजा : याचे एकावर एक दोन दरवाजे आहेत. पैकीं वरच्या दरवाजाच्या आंतील बाजूस पहारेकऱ्यांच्या खोल्या आहेत. बाहेरच्या बाजूस उत्तरेच्या बुरुजांत हत्तीच्या पुढल्या भागाचें शिल्प असून गणेशपट्टीच्या वर दक्षिणेच्या बाजूस डुक्कर किंवा गंडभेरुंड याचें शिल्प आहे. गणेश पट्टीच्याही माथ्यावर दोन ओळींचा एक उठावदार अक्षरांत मराठी लेख आहे तो असा--

श्रीशालिवाहन शके १६७२ कारकी
र्द श्रीमंत बाळाजी बाजीराव पंडीत प्रधान

यावरून असें वाटतें कीं, इ. १७५० (श. १६७२) मध्यें हा किल्ला बाळाजी बाजीरावाच्या ताब्यांत आल्यावर त्यानें या दरवाजाची बांधणी किंवा दुरुस्ती केली असावी. उत्तर बुरुजाच्या उत्तर भागीं माथ्यांत दोन कडीं एकाखालीं एक बसविलीं आहेत. तीं बहुधा निशाणाच्या खांबासाठीं असावीं.

पुणें-डोणजें दरवाजा : याचे एकावर एक तीन दरवाजे असून त्यांतील अगदीं वरच्या दरवाजाच्या दोन्ही बाह्यांचे खांब यादवकालीन आहेत व गणेशपट्टीवरच्या बांधणींत कमळें आहेत. तेव्हां हा दरवाजा निदान उत्तर यादवकालीन असावा असा अंदाज होतो. अगदीं खालच्या दरवाज्यांतून आंत येतांच डाव्या अंगास एक दिंडी आहे. तिनें पूर्व बुरुजाच्या किंवा खांदकडयाच्या खालीं असलेल्या सपाटीवर जातां येतें. या सपाटीच्या पूर्वेस पण निंच भागीं एक मोठी सपाटी असून तीच सिंहगडाची माची असावी.याच

दरवाजाच्या बाहेरच्या अंगानें पूर्वेस थोडें चालून गेल्यावर दोन भुयारें लागतात. यांत वाकून व सरपटत १०।१५ फूट गेलें असतां पाणी भेटतें. हें भुयारांत आहे म्हणून यास **सुरुंगाचें पाणी** म्हणतात.

कोंढाणेश्वर : किल्यावर फार मोठी सपाटी प्रायः नाहींच म्हणावयाची. पण साधारणतः किल्ल्याच्या मध्यभागीं जो उंचवटा आहे त्यास बाले किल्ला म्हणतात. ह्याच्या मध्यभागीं पूर्वाभिमुख हें देऊळ आहे. याचा जीर्णोद्धार केल्याचें स्पष्ट दिसतें. पण गाभाऱ्याच्या चारी अंगांची नक्षी व मनुष्याकृति यादवकालीन आहेत. गाभाऱ्यांत महादेवाची उत्तराभिमुखी पिंडी आहे व बाहेर बसण्यासाठीं एक लहानसा मंडप किंवा पडवी आहे. याच्या नैर्ऋत्येस **दुघई खोल्यांची** एक मालिका आहे. खोल्यांच्या आंतील अंगास भिंतींना चुन्याचा उत्तम गिलावा केला होता. तेव्हां या कोणा खाशाच्या किंवा सरकारी असाव्या. बाले किल्ल्याच्या दक्षिणेस उंचवटयाच्या खालच्या अंगास **अमृतेश्वर भैरव** याचें दक्षिणाभिमुख मंदिर आहे. यांत भैरव व त्याची शक्ति भैरवी अशा दोन उभ्या मूर्ति आहेत. पैकीं भैरवाच्या चार हातांत अनुक्रमें जंबिया, डमरू, त्रिशूल व मुंड या वस्तू असून जवळच मुंडांतून गळणारें रक्त पिण्यासाठीं कुत्रा तोंड वर करून दोन पायांवर उभा आहे. भैरवीच्या चार हातांत भाला, डमरू, त्रिशूल व परळ या वस्तू आहेत. सध्याचें देऊळ छोटें व अर्वाचीन असलें तरी येथें पूर्वी मोठें देऊळ असावें असें येथील अवशेषांवरून वाटतें. हें देवस्थान किती जुनें आहे हें सांगणें कठीण आहे. तरी याचें अस्तित्व सतराव्या शतकाच्या आरंभापासून असल्याविषयीं मला शंका नाहीं. सा ४।७४९ मध्यें आलेला अमृतेश्वराचा निर्देश याच अमृतेश्वराविषयीं असावा. १७ व्या शतकाच्या अखेरीपासून न्यायनिवाडयाचें काम याच्या सान्निध्यांत झालें आणि अठराव्या शतकांत हा व छत्रपति राजारामाचें वृन्दावन यांस संक्रांतीचा तिळगूळ पाठविण्याची प्रथा होती असें दिसतें. अमृतेश्वराची रोजची पूजाअर्चा तर चालू होतीच. पण दर तिसऱ्या वर्षी मोठया प्रमाणांत त्याची

अर्चा किंवा उत्सव होई. त्यासाठीं सुमारें पावणे दोनशे रुपये खर्च होत. इ. १७६३।६४ मध्यें भाऊसाहेबाची बायको पार्वतीबाई हिनें अमृतेश्वरास सोन्याचा मुकुट वाहिला होता. इ. १७७०, ७१ मध्यें हा देव कोणी विच्छिन्न केला म्हणून नवी मूर्ति स्थापन करण्यासाठीं अडीचशे रुपये खर्च केले. पण पुढें कोणी तरी दुष्टानें त्याचें नाकच तोडलें. आतां पुन्हा नवी मूर्ति करावी तर खर्च फार येतो म्हणून पुण्याच्या कृष्णाजी तांबटाकडून नाक नीट करविलें त्यास चार रुपये खर्च झाला. एक मेट व डोणजें अशा दोन ठिकाणींही अमृतेश्वराचीं आणखी स्थानें होतीं असें दिसतें (पुद १।८३; ३। ११८; रा. ६।३४९, ३६३).

या देवळाच्या थोडेसें वर व उत्तरेस तान्हाजीची समाधि आहे. हिचें सध्या दिसणारें सर्व काम इ. १९३७–४० चे दरम्यान झालें आहे. तत्पूर्वी तेथें सध्या समाधीच्या मागें ठेवलेलें एक चौकोनी, शिखराचें वृन्दावन होतें आणि शेजारीं विविध प्रकारचे सतीचे दगड होते. तान्हाजीचें दहन कोठें झालें हें समजण्याचें साधन आज अज्ञात आहे. पण या ठिकाणीं जे अवशेष आहेत त्यांवरून वाटतें कीं, तान्हाजी व आणखी कांहीं वीर यांचें या ठिकाणीं देहपतन झालें असणें शक्य आहे. इ. १९३५मध्यें सिंहगड-तानाजी स्मारक मंडळ स्थापन झाल्यावर त्या मंडळानें स्मारक व स्मृतिदिनानिमित्त करावयाचा प्रतिवार्षिक उत्सव यांसाठीं देणगीरूपानें पैसे जमवून सध्याचा चबुतरा, त्यावरील तानाजीचा ऊर्ध्वांगी पुतळा, भोवतालचा लोखंडी कठडा, मेघडंबरी,कुंपण इत्यादि कामें केलीं आणि प्रतिवर्षी माघ वद्य नवमीस तें मोठ्या उत्साहानें तानाजीची पुण्यतिथि साजरी करीत असतें.

सध्या येथें असलेल्या सर्व अवशेषांत उत्तम स्थितींत असलेला अवशेष म्हणजे छत्रपति **राजारामाची समाधि** होय. ही कोंढाणेश्वराच्या उत्तरेस बऱ्याच अंतरावर असलेल्या एका खोबणींत अगदीं कड्यानजीक आहे. ही एक साधारण चौरस पूर्वाभिमुख खोली असून ती एका उंच जोत्यावर उभारली आहे व तीस शाहजहानी पद्धतीची घुमटी आहे. हींत मध्यभागीं पोकळ वृन्दावन

असून त्यांत पश्चिम भिंतीच्या मध्यांत एक देवळी आहे. हींत एक देवी, दोन बाण, राजारामाच्या म्हटल्या जाणाऱ्या पादुका व इतर एक दोन देवदेवी अशा पूजनीय वस्तु ठेवल्या आहेत. या बाणांची पूजा करणारे वो-ओदक आडनावाचे विठ्ठल व त्याचा मुलगा रघुनाथ असे दोन ब्राह्मण होऊन गेले. पुढें त्यांचें बाणपुजारी हेंच आडनांव झालेसें दिसतें. दोहोंपैकीं तेजस्वी बाण पाझरतो अशी आख्यायिका आहे. यामुळें असो किंवा आणखी कांहीं कारणानें असो, पण पेशव्यांनीं हा एकदां आपल्याकडे मागवून घेतला होता. तो परत पूर्वींप्रमाणें समाधीवर ठेवण्याबद्दलचें इ. १७७९एप्रिल२० चें एक आज्ञापत्र उपलब्ध आहे. या वृन्दावनाच्या पूजेविषयीं राज शक २७, विक्रम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य ९, इंदुवासर (इ. १७०० डिसेंबर २३) या कालाचें व राजारामाचा मुलगा छत्रपति दुसरा शिवाजी यानें दिलेलें एक सर्वप्राचीन पत्र उपलब्ध आहे. त्यावरून असें दिसतें कीं, छत्रपति राजाराम मरतांच त्याचें वृन्दावन करून त्याच्या पूजाअर्चेची व्यवस्था लावण्याबद्दल रामचंद्रपंत अमात्यास आज्ञा केली होती; पण सिंहगडाचा प्रदेश शंकराजी नारायण सचीव याच्या ताब्यांत होता. तो शिवाजीस भेटला नाहीं. यामुळें वृन्दावनाची नीट व्यवस्था झाली नाहीं. शिवाजीनें नेमून दिल्यापैकीं केवळ कांहीं अंश सचिवाचा अधिकारी नरहरिपंत यांनीं पावता केला अशी हकीकत वृन्दावनाचा मराठा पुजारी कृष्णाजी ढमढेरे यानें सांगितल्यावरून शंकराजीपंत सचीव व त्र्यंबक शिवदेव यांस आज्ञा करण्यांत आली कीं, वृन्दावनाची योग्य ती व्यवस्था करून द्यावी. शिवाय बहुधा सिंहगडाच्या जामदारखान्यांत असलेली जरीची आस्मानगिरी (छत्री) वृन्दावनावर लावून ठेवण्याकरितां देण्याविषयीं सिंहगडाचा हवालदार सिधोजी जाधव यास आज्ञापिलें. तसेंच वृन्दावनाची पूजानैवेद्यादि कृत्यें यथासांग करण्याविषयीं कृष्णाजी ढमढेऱ्यास सांगितलें.[1] पुढें लव-

---

१ प्रस्तुत कागद मुंबई इलाख्याच्या सेक्रेटॅरिएट रेकॉर्ड्स ऑफिसच्या १९५१–५२ सालच्या वृत्तांतांत पृष्ठ ३५ पुढें परिशिष्ट ७ म्हणून छायाचित्राच्या रूपानें प्रकाशित केला आहे. पण तो कोठून मिळाला हें मात्र नमूद

करच सिंहगडाच्या जवळचें आगळंबें हें गांव वृन्दावनास इनाम दिलें गेलें. राज्याभिषेक वर्ष ३५, विरोधी, चैत्र वद्य १३, रविवार (इ. २७।३।१७०९) या कालच्या शाहूच्या सनदेंत पेशजीपासून अशा शब्दांनीं या घटनेचा निर्देश केला आहे. या वृन्दावनाचा अगदीं पहिला ब्राम्हण पुजारी कोण होता तें कोठें आढळत नाहीं. हरजी बिन कृष्णाजी ढमढेरे, हरजीचा मुलगा खंडोजी व त्याचा मुलगा लक्ष्मण हे मराठे गृहस्थ इ. १७९३ पर्यंत वृन्दावनाचे आनुवंशिक पुजारी होते. पण त्या सालीं लक्ष्मणानें देवाकडील दागिने चोरल्यामुळें त्याच्या जागीं सटवाजी पवार याची नेमणूक झाली. दरम्यान वृन्दावनांत बाणाची स्थापना करून ताराबाईनें इ. १७५४ डिसेंबर २० च्या पत्रानें मोरेश्वर नीळकंठ पलुसकर या ऋग्वेदी ब्राम्हणास वंशपरंपरेनें वृन्दावनाच्या पूजेचें काम सांगितलें आणि त्यासाठीं आगळंबें गांवावर दोनशें रुपयांची नेमणूक करून दिली. स्वराज्याच्या स्वस्थतेच्या काळांत आगळंब्याचा वसूल क्रमानें वाढूं लागला त्याप्रमाणें समाधीकडील खर्चही वाढूं लागला. रोजची पूजा-अर्चा, नैवेद्य, श्रावणमासिक अभिषेक, समाराधना, इ. कार्यक्रम फार पूर्वींपासून चालू होते. पण त्यांच्या जोडीस कालक्रमानें तुलसी-विवाह, संवत्सर प्रतिपदा, पक्ष, श्राद्ध व त्यावेळीं कीर्तन, इत्यादि कार्यक्रम होऊं लागले. श्राद्धाच्या समाराधनेंत एक वैशिष्टय होतें. तीमध्यें हजार पांचशें ब्राह्मण तर जेवतच; पण सिंहगडावरील शिबंदीचे व इतर झाडून सारे लोक आणि आगळंबें गांवची रयत या सर्वांस जेवण घालीत. कधींकधीं समाधीच्या या सर्व कार्यक्रमांचा वार्षिक खर्च एक हजार रुपयांपर्यंतही जात असे.

समाधीची सर्व व्यवस्था पेशवाईअखेर उत्कृष्ट चालू होती हें इ. १८१८ मध्यें झालेल्या उत्सवाच्या खर्चावरून स्पष्ट होत आहे.

केलेलें नाहीं. ही पद्धत अशास्त्रीय आहे असें मला वाटतें. कागद प्रकाशित करणारानें कागदाचें प्राप्तिस्थल सांगितलें पाहिजे. प्राप्तिस्थलाचा माग घेऊन आणखीही कागद मिळवितां येतात हा प्राप्तिस्थल नोंदण्याचा मोठा फायदा आहे. माझ्या स्मरणाप्रमाणें या कागदाबरोबर आणखीही एक कागद त्या कचेरीस मिळाला होता.

पण पेशवाई बुडाल्यावर कांहीं काळ तिची आबाळ झाली असावी. इ. १८५१ मध्यें समाधीची पुन्हां एकदां व्यवस्था लावून देण्यांत आली. तीसंबंधीं एक अप्रसिद्ध पंधरा कलमी याद भा. इ. सं. मंडळाच्या संग्रहीं आहे. तींत जुने पुजारी एक ब्राह्मण पलुसकर व दुसरा मराठा ढमढेरे, या दोघांनीं कोणत्या क्रमानें कशी पूजा करावी, पूजेकरितां पाणी ज्या टाक्याचें घ्यावयाचें त्याची स्वच्छता कशी राखावी, देवाच्या बागेविषयीं माळ्यानें कोणती दक्षता घ्यावी, पुण्यतिथीच्या उत्सवप्रसंगीं मंडपाची व्यवस्था कोणी व कशी करावी इत्यादि फार बारकाव्याची माहिती आली आहे. सध्या या समाधीच्या पूजेअर्चेसाठीं ढमढेरे (मराठा) व पलूसकरांतर्फे साबणे (ब्राह्मण) अशा दोघांची नेमणूक असून खर्चंवेच सातारच्या शाहू छत्रपतींच्या वंशजांकडून चालतो (अका; भूभ्र ६३).

कल्याण दरवाजाकडून नैर्ऋत्येकडील बुरुजाकडे जातांना बुरुजाजवळच उंचवट्यावर एक थडगें आहे. तें **उदेभान राठोड** याचें असावें असा समज आहे. पण यावर आक्षेप असा कीं, उदेभान हिंदू असल्यास त्याच्या करितां कबर कशी उभारली जाईल आणि मुसलमान असल्यास उदेभान राठोड हें नांव शिल्लक कसें राहील? तात्पर्य याबाबत निश्चय नाहीं हेंच खरें. पुणें दरवाजानें वर येतांना उजवीकडे एक दगडी इमारत असून तिचें छप्पर दुपाखी चुनेगच्ची आहे. या इमारतींत नवी भर व दुरुस्ती पुष्कळ झाली असली तरी हा **दारूखाना** होता असा समज आहे. येथें पदमजी नांवाच्या पारशी गृहस्थाचे दोन बंगले आहेत. पैकीं अतिपूर्वेकडील बंगल्याच्या मागें पश्चिमेस एक आवार आहे. पूर्वी त्याच्या चारी बाजूंनीं भिंत असल्याचें आजच्या अवशेषांवरून स्पष्ट दिसतें. या भिंतीचीं उत्तरदक्षिण अंगचीं दारें (कमानी) सध्या उभीं आहेत. या जागेस **जवाहिरखाना** म्हणतात. जवाहिरखाना सरकारी कचेरीच्या जागेंत असणार हें उघड आहे. तेव्हां जुन्या कागदांत उल्लेखिलेला जवाहिरखान्यासह **सरकार वाडा** येथें असला पाहिजे. येथून पश्चिमेस पण जवळच असलेला आपला दुसरा बंगला पदमजींनीं श्री. शं. रा. भागवत यांच्या रूरल डिव्हेलपमेन्ट असोसिएशनला दिला

होता. त्या जागेस **राजवाडा** म्हणतात. तेव्हां सदरेजवळचा राजवाडा म्हणून ज्याचा निर्देश जुन्या कागदांत आहे तो येथें असावा.

गडावर एकंदर ४८ टाकीं असून त्यांपैकीं फक्त चार टाक्यांत पाणी नाहीं. तळीं तीन असून उन्हाळ्यांत तीं कोरडीं पडतात. विहीर एकच आहे. कांहीं टाक्यांना नांवें आहेत. उदाहरणार्थ गणेश टाकें, देव टाकें, राजाराम टाकें वगैरे. पैकीं पहिलीं दोन टाकीं नकाशांत दाखविलीं आहेत. गणेश टाकें पोहण्याकरितां व देव टाकें पिण्याच्या पाण्याकरितां प्रामुख्यानें वापरतात. राजाराम टाकें राजारामाच्या समाधीच्या दक्षिणेस आहे.

गडावर खडकांत खोदलेलीं तीन आवारें आहेत. पैकीं दोन पुणें दरवाजांतून थोडेंसें पुढें जातांच डाव्या हाताला लागतात. ह्यांतील पहिलें दोन अडीच खणांच्या खोलीयेवढें अगदीं छोटें आहे. दुसरें ह्याच्या उजव्या बाजूस अगदीं सन्निध व बरेंच विस्तृत आहे. येथें घोड्यांची पागा होती असें म्हणतात. सुमारें २५ ते ३० तट्टें या आवारांत राहूं शकतील. त्यांत पाण्याचीं टाकीं व हौदही आहेत. तिसरें देव टाक्याच्या आग्नेयीस सुमारें ५० पावलांवर असून अदमासें ३०० लोक ऐसपैस बसूं शकतील येवढें मोठें आहे. दुसऱ्या दोन्ही आवारांत चौकोनी खांब आहेत. त्यांतील प्रत्येकीं एकदोन खांब आतां धुपून पडले आहेत. शेवटच्या आवारांत एक कोनाडेवजा खाच आहे. हीं आवारें घोड्यांच्या पागा होत्या अशी समजूत असली तरी मला तें पटत नाहीं. एक तर यांची जमीन व छत यांमधील अंतर इतकें कमी आहे कीं यांत तट्टें किंवा शिंगरेंच राहूं शकतील. मोठे घोडे यांत शिरूं शकणार नाहींत व आरामांत राहूं शकणार नाहींत. शिवाय पावसाळ्यांत यांत पाणी साठत असल्यानें हीं निरुपयोगीच होतील. मला वाटतें शिवनेरी गडावरच्याप्रमाणें हे जलाशयच आहेत. येवढेंच नव्हें तर हे मुसलमानपूर्वकालींच खोदले असण्याचा संभव आहे. फक्त सध्या यांची पडझड झाली आहे आणि पूर्वीं यांतील पाणी काढून टाकून हे राहण्याजोगे करण्याचा यत्न केलेला दिसतो.

गडाच्या भोवतीं पुढील चार **मेटें** (कायम पहाऱ्याच्या जागा)

असल्याचें दिसतें.पूर्वी याहून अधिक असावीं.तीं अशीं–(१) दक्षिणेचें कल्याणकडील मेट–मेटकरी पिलावरे–हल्लीं ओसाड; (२) नैऋत्येस कळकीचें मेट–मेटकरी लांघे कोळी; (३) पश्चिमेस अमरीचें मेट–मेटकरी जोरकर कोळी व चव्हाण मराठे; (४) उत्तरेस सडकेचें मेट–मेटकरी गायकवाड कोळी.

जुन्या कागदांत **घेरा सिंहगड** असा शब्द येतो. या घेऱ्यांत १ कोंढणपूर, २ कल्याण, ३ थोरलें गोऱ्हें, ४ धाकटें गोऱ्हें, ५ खानापूर, ६ खामगांव, ७ मालखेडें, ८ डोणजें अशीं आठ गांवें येत असल्यानें त्यास आठगांव घेराही म्हणत. सध्या घेरा सिंहगड हा जमीन महसुलाचा एक स्वतंत्र शेवटचा घटक असून त्यांत उपर्युक्त गांवांपैकीं कांहींची थोडथोडी जमीन घातली आहे.

संकीर्ण माहिती

पेशवाई जमाखर्चांत खर्चाच्या बाजूस, १ बदल मुशाहिरा (मुशाहिऱ्या–पगाराबद्दल पडणारा खर्च) व २ खेरीज मुशाहिरा (पगाराखेरीज इतर बाबींसाठीं पडणारा खर्च) अशीं दोन सदरें असत. पैकीं पहिल्या सदरांत केवळ नोकरांच्या पगारासाठीं खर्च झालेल्या पैशाचा हिशेब असे. सिंहगडाच्या खेरीज मुशाहिऱ्यांत १ देवस्थानें, २ धर्मादाय, ३ वर्षासनें, ४ खैरात, ५ शाकारणी, ६ दप्तर, ७ देहनगी, ८ नानपरवेशी, ९ शिरपाव, १० चांदरात, ११ राबते महार, १२ सण, १३ रोशनाई, १४ पावसाळ्यांत वोढे (लाकडी ओंडे) १५ ओंडे खरेदी, १६ बंदिवान, १७ नैमित्तिक उत्सव (दसरा, दिवाळी, कार्तिक द्वादशी, संक्रांत, शिवरात्र, शिमगा, रंगपंचमीसह) यांसाठीं निरनिराळे खर्च पडले आहेत. ही खर्चाचीं नेहमीचीं सदरें होत. पण प्रत्येक सालीं केवळ त्या सालापुरते कांहीं खर्च असत. त्यांस येकसाली खर्च म्हणत. इ. १७६७–६८ सालच्या नेमणूक-बेहडचावरून त्या सालीं सिंहगडासाठीं एकंदर खर्च ४९३२४८७ इतका झाला. यांत बदल मुशाहिरा खर्च ३८९२९८७ होता. या वर्षी तेथें सरकारी नोकर (नेहमीचे लोक ३४८+मुद्दाम जास्त ठेवलेले ३०५+अधिकारी ४१ व इतर १०० असे) ७९४

होते. पैकीं अधिकारी, त्यांचे पोर्गे (वैयक्तिक पण सरकारी खर्चानें मिळालेले नोकर) व त्यांचे वार्षिक पगार यांचा तपशील असा-* (१) तुकोजी सोमवंशी हवालदारातर्फे गोविंदराव बाजीराव मोरे (खुद्द १ व पोर्गे २)=६००.(२) कृष्णाजी जाधव (मुलगा संभाजी) सरनोबत(१+१)=२००.(३) त्रिंबक सदाशिव सबनीस (महिपतराव त्रिंबक पुरंदरे)साठीं महादाजी गोविंद(१+१)=४३३.(४) विठ्ठल यशवंत कारखानीस (तर्फे बाजी कमाजीराव १+१) =२००(५)सखो मल्हार सुभेदार(१+२)=४५०.(६)सबनिसातर्फे विनायक राजदेव फडणीस(१+१)=२००.(७)कारखाननीसातर्फे बाबूराव मल्हार फडणीस = २००.(८-११)चार दप्तरदार (१ गोविंद बहिरव २००+ २ महादाजी गोविंद २००+ ३ खंडो गोविंद तर्फे दत्तो बापू २००+ ४ गणो वामन सहस्रबुद्धे२००+ ५ आबाजी बल्लाळ१३५=९३५)=८००.(१२)हरि बापूजी पोतनीस २००. हे सर्व असामी व त्यांचीं तीन घोडीं मिळून ४१ इसम होते व त्यांच्यासाठीं ५३६८ रु. खर्च पडले. ३८९२८८७ पैकीं बाकीचे रुपये सैनिक-शिपाई वगैरे नोकरांसाठीं खर्च झाले असले पाहिजेत. खेरीज मुशाहिऱ्यांत दप्तर १००+तैवज (पानसुपारी) ३०+ देवस्थानें व अनुष्ठानें १२५+ धर्मादाव१००+शाकारणी१२५+ दसरा १००+ मोलकरणी २५+ सरकारी ओढे (कांबळीं?) बैलास पेंड वगैरे २७५+ किरकोळ १२०+ पाटीलकुळकर्ण्यांस वस्त्रें ५०+ सरकारी कामासाठीं लागणारे जिन्नस १०४०+ सरकारी कामावरचे सुतार, गवंडी, लोहार, बेलदार यासाठीं६३९ मिळून २७२९ रुपये खर्ची टाकले आहेत. येकसालीं खर्चांत इमारतीसाठीं ४००+ अब्दागिऱ्यांसाठीं ४०८१०+ नगाऱ्यासाठीं ३०+निरोप दिलेल्या लोकांस द्यावे लागलेले२८९५ +वडगांवच्या

* 'पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद' खंड ४५ मध्यें ले. ६ पृ. २८-४२ पर्यंत सिंहगडासंबंधीं जमाखर्च प्रकाशिले आहेत. त्यांवरून येथील माहिती संकलित केली आहे. पण ते जमाखर्च इतक्या सदोष पद्धतीनें छापले आहेत कीं, त्यांतून सुसूत्र, बिनचूक व संपूर्ण माहिती देणें अशक्य आहे. पुढें दिलेल्या अधिकाऱ्यांच्या यादीपैकीं कंसांतील मजकूर इ.१७७४-७५सालाविषयीं आहे.

बागेसाठीं ७०० मिळून ७६६५८१० रुपयांचा हिशेब आहे. सारांश बदल मुशाहिरा ३८९२९८७+ खेरीज मुशाहिरा २७२९+ येकसाली ७६६५८१० मिळून ४९३२४८१ खर्च दाखविला आहे. इ. १७७१–७२ सालच्या अंदाजपत्रकांत हाच खर्च ४९४२९८२ दाखविला असून तेव्हां सरकारी पगार घेणारीं माणसें ८२५ होतीं. यांत पूर्वीं अनुल्लिखित असे जेजालंदाज, जोशी, घडचाळची, नौबती, कोठीवाले, रक्तवान, गोलंदाज, फरास, न्हावी, जासूद, भालदार व शिपायांचीं बायकामुलें इतकीं आणखी माणसें आलीं आहेत. या वर्षीं वीज पडल्यानें इमारतीचें फार नुकसान झालें म्हणून दुरुस्तीसाठीं ८७०० रुपये खर्चीं टाकले आहेत. इ. १७७३–७४ मध्यें बदल मुशाहिरा खर्चच ४९३४१८५ इतका होता. पण खेरीज मुशाहिरा इ. १७६७–६८प्रमाणें २७२९रु. होता. इ. १७७४–७५ सालीं हेच खर्च अनुक्रमें५२९१५८८व २८२४रु. होते. इ. १७७५–७६ सालीं एकंदर खर्चाची रक्कम ५५७७९८८ आणि बदल मुशाहिरा खर्च ५२९१५८४ रुपये होता.

गडावर नेमक्या कोठें व किती वास्तु होत्या हें सांगतां येत नसलें तरी अप्रकाशित कागद, इ. १७७१सालीं वीज पडल्यामुळें दुरुस्त कराव्या लागलेल्या इमारतींची यादी आणि इ. १७८९–९०सालीं दिवेलावणीसाठीं पडलेला खर्च यांवरून तेथें निदान पुढील इमारती होत्या असें दिसतें. बाले किल्ला व त्याची सदर, राजमंदिर व त्याची सदर, थोरली व धाकटी सदर, सदरेपुढील बंगला व जवळचा राजवाडा, डोणजे दरवाजावरील बंगला, जवाहिरखान्यासह सरकारवाडा, चौकीपहाऱ्याकडील अमलदारांचा वाडा, पुणें वाडा, इस्ताद कोठी, भातखळचाची कोठी, दोन अंबारखानें, दारूखाना, दोन कल्याण दरवाजे, तीन डोणजे दरवाजे, यशवंत, झुंझार, आले व खांदकड्याचा असे बुरूज, तटावरील व तटाजवळच्या चौक्या, अमृतेश्वर, कोंढाणेश्वर, गणपति, नरसिंह, रामदासी मठांतील, दोन हणमंत, राजाराम समाधि अशीं देवळें व देवळचा, गणेश, देव, अंबारखान्यामागचीं व समाधीजवळचीं अशीं टाकीं, जातेघर, शृंगार चौकी इत्यादि. या यादींत क्वचित् एकच वास्तु दोन नांवांनीं

नोंदली असण्याचा संभव आहे. उलट सामान्य लोकांचीं राहण्याचीं घरें व कैदखाने हे येथें नोंदलेले नाहींत. पण ते येथें निश्चत होते. याशिवाय (तटावरील दोन अलंगा चौक्या), तटानजीकच्या दोन अलंगा, भातखळें (सडकेचें मेट व आतकरवाडी यामध्यें ही जागा आहे), पागा, चौक्या, अनामक टाकीं इत्यादि होतीं तीं निराळींच.

इ. १७८९–९० च्या नेमणूक–जाबत्यावरून तेथील देवता व त्यांचे अंगरंगभोग यांविषयीं पुढील माहिती समजते. १ अमृतेश्वर भैरव : प्रत्येक रविवार–शेरणी व विडा; श्रावण–अभिषेक; चैत्र व आषाढ–जत्रा; नैवेद्य, नंदादीप, कार्तिकी व फाल्गुनी पौर्णिमा; दसरा–बकरें (नक्त). २ कोंढाणेश्वर महादेव : श्रावण–अनुष्ठान, दसरा, कार्तिक पौर्णिमा, नैवेद्य, नंदादीप. ३ नरसिंह : आषाढ–समाराधना, श्रावण–अभिषेक, दसरा, नैवेद्य, नंदादीप. ४ रामकडा भवानीः दसरा–बकरें (ही देवता कळकीच्या मेटाचे खालीं आहे) ५ कल्याण दरवाजा–मळाई : दसरा–बकरें (ही देवता कल्याण दरवाजाच्या अलीकडे डाव्या अंगास आहे). ६ कुरणांतली धार-जाई (ही देवता डोणजें आतकरवाडी खोऱ्याच्या पूर्वेकडील दांडा-वर आहे). ७ खांदकड्याचा म्हसोबा (हा खांदकड्याच्या माथ्या-वर आहे). ८ गणपति. ९ हनुमंत. १० चौंडाई : दसरा (ही देवता भातखळचाजवळ आहे). ११ रामदासी मठ : नंदादीपासाठीं दर-महा सहा शेर तेरा छटाक तेल. याखेरीज आगळंब्याचा नेरसेश्वर, डोणज्याचे अमृतेश्वर व द्रोणेश्वर, पाषाणचा सोमेश्वर व कोंढण-पूरची भवानी यांचे नित्यनैमितिक उपचार गडावरील पैशांतूनच चालत असत.

या गडाशीं संबद्ध अशा कांहीं अधिकाऱ्यांचे निर्देश वर (पृ ३९, ४०) आले आहेत. त्यांखेरीज इतर आढळले ते येथें देतों. ही यादी निःशेष मात्र नव्हे. तसेंच हीमधील कालही पक्के नव्हत.

नागकोळी इ. १३२८

मीर अजम मीर यूसुफ नायब हवालदार इ. १६१० सा २।१

साबाजी नारायण सबनीस इ. १६२३ रा १६।१०

सीदी अंबर अब्दुल वहाब (अब्दुलसाहेब) हवालदार इ. १६२३
सा३।६२५

(किले कोंढाणा मुजाफती किले तोरणा इ. १६३२ सा ५।९५०)
दादाजी कोंडदेव सुभेदार नामजाद इ.१६३३? १६३६-४७
सा २।९५; त्रै ४।९१; अका

मिया अजम मिया साहेब इ. १६५१ सा १।५६
पदो नारायण सभासद नामजाद इ. १६५८ सा २।९८
शाहिदखान किलेदार इ. १६६५ शिचवृसं ३।३७
उदेभान किलेदार इ. १६६९ ऐसंसा ४।५०।९४
मोरो भास्कर कारखाननीस इ. १६८७ रा १८।५७।७८
सिधोजी प्रतापराव गुजर किलेदार इ. १६८९ संराच ४७
रामचंद्र नीळकंठ अमात्य जिल्हेदार इ. १६९० ऐसंसा ३।९७
सिधोजी जाधव मुद्राधारी इ. १७०३ त्रै ७।७४,७५
देवीसिंग किलेदार इ. १७०५ त्रै ६।८७,८८
आनंदराव बहिरव दिम्मत सचीव इ. १७२१ ऐसंसा ५।७०।७५
आपाजी सोमवंशी नामजाद हवालदार इ. १७२४
सा ५।९७४।२६२

भगवंतराव सोमवंशी हवालदार इ. १७३०–३१, रा १३।१५६;
त्रै ८।२३।४

कान्होजीराव पासलकर नामजाद इ. १७३१ पेद ३१।१३०
संताजी सोमवंशी हवालदार इ. १७३३ अका
दाजीपंत मुतालीक सचीव इ. १७३६, ३९ पेद २२।३४३
जिवाजी गणेश खाजगीवाले कमाविसदार इ. १७५०
रा २ पृ. ११२, ११३

तुकोजी सोमवंशी हवालदार, बहिरजी सिलिमकर मुतालीक हवालदार, संभाजी जाधव सरनौबत, बापूजी कमाजी कारखाननीस, बाबूराव मल्हार फडणीस, महादोबा व निळो महादेव पुरंदरे सबनीस, महादाजी गोविंद अवसरीकर (पुद १।२२६; रा ६।६०) मुतालीक सबनीस, नारो बापूजी हवालदार?, रंगो कोनेर त्रिंबक कारखाननीसाकडील फडणीस, यशवंत महादेव कारखाननीस, गोविंद

रामचंद्र माजी सबनीस, हाली सभासद, विनायक भोजदेव फडणीस दिमत सबनीस, सखो मल्हार सुभेदार, बाबूराव हरी सभासद, गोविंदराव मोरे मुतालीक हवालदार (बहिरजी सिलिमकराच्या जागीं) इ. १७५० अका
बाळाजी गोविंद सभासद इ. १७५१ अका
जगन्नाथ नारायण निसबत जिवाजी गणेश ऐवजीं शिवराम रघुनाथ व्यवस्थापक इ. १७६४, ६६, ६८, ७२ अका; पेद ४५।६
नारो बापूजी बंदोबस्तास इ. १७६५-६६ „
भगवंतराव येरुणकर हवालदार ऐवजीं त्याचा भाऊ खंडेराव इ. १७७२ अका
बाबूराव मालुसरे कुलाबकर इ. १७७३ अका
भगवंतराव येरुणकर ऐवजीं त्याचा भाऊ मदनराव इ. १७७३ अका
त्रिंबक गणेशभट सबनीस इ. १७७३ अका
भगवंतराव येरुणकर ऐवजीं गोविंदराव मोरे इ. १७७३–७६, अका; पेद ४३।८१
आनंदराव जिवाजी व्यवस्थापक इ. १७७३ अका; पेद ४५।६
पुरंदरे सबनीस इ. १७७४ अका
रामाजीराव अंताजीराव इंदुलकर हवालदार इ. १७७७, ७८ अका
नारो महादेव गद्रे कमाविसदार इ. १७७७, ७८ अका
केसो बाबाजी बर्वे (सबनीस) इ. १७७७ अका
विसाजी केशव लेले कमाविसदार आगळंबें इ. १७७८ अका
सुभानजी नाईक गोळे सरनौबत इ. १७७८ अका
महिपतराव त्रिंबक सबनीस ऐवजीं केसो बाबाजी बर्वे इ. १७७८ अका
नारो महादेव गद्रे इ. १७७८, ९४ अका
नारो महादेव गद्रे ऐवजीं केशव जगन्नाथ इ. १७८५, ८६ अका
केसो बाबाजी सबनीस ऐवजीं महादाजी कृष्ण इ. १७८६ अका
रामाजी इंदुलकर हवालदार ऐवजीं हणमंतराव सुभानराव साळवी इ. १७८५, ९३ अका; पेद ४५।१४७
हरी कृष्ण पोतनीस ऐवजीं भगवंत यशवंत इ. १७८६ अका
शिवजी कृष्णाजी यादव सरनौबत इ. १७९३ अका


नारो महादेव गद्रे मामलतदार ऐवजीं	
बापूजी नारायण गद्रे	इ. १७९६ अका
बाळाजी बाबूराव मामलतदार	इ. १७९८ अका
गोविंद सदाशिव सुभेदार	इ. १८०३ अका

उपसंहार

येथील अवशेषांचें वर जें वर्णन केलें त्यावरून दिसून येईल कीं, केवळ दगडामातीच्या श्रीमंती अवशेषांचाच विचार केला तर दिल्ली, आग्रा, लाहोर, मांडव, इत्यादि मुसलमानी जमान्यांतील किल्ले किंवा चितोड, जोधपूर, आंबेर, ग्वाल्हेर, इत्यादि राजपूती किल्ले यांच्या पासंगालाही येथील अवशेष पुरणार नाहींत. येवढेंच काय पण महाराष्ट्रांत मराठ्यांनीं बांधलेला असा एकही किल्ला नाहीं कीं, जेथील अवशेष उपर्युक्त किल्लेकोटांतील अवशेषांशीं स्पर्धा करूं शकतील. पण महाराष्ट्रांतील किल्ल्यांचा मोठेपणा विलासी-जीवनाचे विविध पैलू दाखविणाऱ्या त्या दगडाविटांच्या किंवा संगमरवरी इमारती अगर कौशल्यपूर्ण रचनेचे हौद, कारंजीं व तळीं यांत नाहीं. पितृभूमि, मातृभूमि, कर्मभूमि, इत्यादि सर्व कांहीं असलेला हा आपणा सर्वांचा प्राणप्रिय भारत देश एके वेळीं आमचा धर्म, संस्कृति, भाषा, तत्वज्ञान, आचार, इत्यादि सर्व बाबींत केवळ भिन्न असलेल्या नव्हे तर त्यांविषयीं कमालीचा द्वेष बागळणाऱ्या आणि संधि मिळतांच त्यांचा नाश करण्यांत पुण्य समजणाऱ्या परकीयांनीं अशा तऱ्हेनें व्यापून टाकला कीं, आमचा धर्म टिकतो कीं नाहीं अशी भीति उत्पन्न झाली, आमच्या संस्कृतीचें काय होणार हें समजेनासें झालें, आमची भाषा मरून जाण्याचा संभव दिसूं लागला, आमच्या तत्वज्ञानाला ग्रहण लागलें, आमचे उच्चारांत भ्रष्टता आली, आमचे आचार उत्सन्न झाले, आमच्या समाजाचें स्वतंत्र अस्तित्वच धोक्यांत आलें. अशा वेळीं ज्यांनीं आपला धर्म, आपली संस्कृति आणि आपली भाषा यांच्या रक्षणासाठीं आपल्या प्राणांच्या हसत मुखानें आहुति दिल्या, आपल्या बायकामुलांची

पर्वा केली नाहीं, आपली सर्व स्थावरजंगम मिळकत कस्पटासमान मानली, शत्रूच्या बलाची क्षिति न बाळगतां त्याशीं झुंजले व स्वतः, बायकामुलें, घरेंदारें, सगेसायरे यांसह नाहींसे झाले. पण प्रतिकाराचा अग्नि सतत जळता ठेवून ज्यांनीं शत्रूचा पुरा नायनाट केला आणि या अखिल भारतांतील जुलूम, अन्याय, असहिष्णुता, विषमता यांचा धुडगूस पुरा मोडून काढून त्या ठिकाणीं शांतता, न्याय, समता व सहिष्णुता यांचें राज्य फैलावण्याची खटपट केली, त्यांच्या सत्कार्याचे भव्य राजवाडे आणि सहिष्णुतेचे शांत जलाशय, त्यांच्या धैर्याचे भक्कम तट व औदार्याचे विशाल दरवाजे, त्यांच्या शौर्याचे कडेलोट व वीर्याचे बुरूज, त्यांच्या न्यायाचीं मंदिरें व समतेच्या धर्मशाळा, त्यांच्या उच्च तत्त्वज्ञानाचीं कारंजीं आणि खोल निष्ठेचीं गव्हरें, या गोष्टींत त्यांचें मोठेपण असून हा मोठेपणा ध्यानांत घेण्यासाठीं अशा गडांवर जावयाचें आहे. आमच्या पूर्वजांनींच या सर्व गोष्टी केल्या असल्यानें आम्हांस तर अशीं स्थानें म्हणजे ऐतिहासिक तीर्थेंच वाटलीं पाहिजेत. पंढरपूर, तुळजापूर, कोल्हापूर, आळंदी, जेजूरी इत्यादि जशीं आमचीं धार्मिक क्षेत्रें व त्यांच्या ज्याप्रमाणें आम्ही वाऱ्या करतों, तद्वत् शिवनेरी, रायगड, सज्जनगड, सिंहगड, वढू हीं आमचीं धर्मक्षेत्रेंच होत. आम्ही त्यांच्या नित्य वाऱ्या केल्या पाहिजेत. आणि डोळस श्रद्धेनें आमच्या पूर्वजांचा, शौर्य, धैर्य, औदार्य इत्यादि गुणसमुच्चय व पुण्यकर्में यांचा अभ्यास करून त्यांहून उच्चतर गुण दाखवून व पुण्यतर कर्में करून त्यांना मागें टाकण्याचा यत्न केला पाहिजे. तरच या स्थानांचें दर्शन घेतल्याचें सार्थक.

सिंहगडाची आकृति



अंकांचा खुलासा

१ पुणें दरवाजा
२ दारूखाना
३ छत्रपति राजा-
रामाची समाधि
४ कोंढाणेश्वर
५ तानाजी–समाधि
६ अमृतेश्वर–भैरव
७ देव टाकें
८, १५ पागा ?
९ उदेभानाचें
थडगें ?
१० टेहळणी बुरूज
११ झुंजार बुरूज
१२ कल्याण दरवाजा
१३ जवाहिरखाना
१४ गणेश टाकें
१६ सुरुंगाचें पाणी
१७ राजवाडा

नकाशाचें प्रमाण
१ इंच = ६६० फूट

आधारग्रंथ व त्यांचे संक्षेप

अका–अप्रकाशित कागद; पेशवे दप्तरांतून निवडलेले
इवृ–भारत इतिहास संशोधक मंडळ इतिवृत्त; शक व पृष्ठ
ऐफासा–ऐतिहासिक फार्सी साहित्य; खंड व लेखांक
ऐलेपयाव–ऐतिहासिक लेख, पत्रें, यादी. वगैरे; लेखांक
ऐलेसं–कै.वासुदेवशास्त्री खरे कृत ऐतिहासिक लेखसंग्रह; भाग व लेखांक
ऐसंसा–ऐतिहासिक संकीर्ण साहित्य; खंड व लेखांक
केंब्रिज–केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया; ३ रा खंड व पृष्ठ
चंद–चंद्रचूड दप्तर; खंड व लेखांक
त्रै–भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक; वर्ष व पृष्ठ
पुणें गॅझे–पुणें गॅझेटियर; ३ रा भाग व पृष्ठ
पुद–पुरंदरे दप्तर; खंड व लेखांक
पेद–पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद; खंड व लेखांक
फिरिश्ता–नवल किशोर फार्सी प्रत; खंड व पृष्ठ
बुर्हान–बुर्हान-इ-मासिर, फार्सी प्रत; पृष्ठ
ब्लॅकर–मेमॉइर ऑफ......दि मराठा वॉर ऑफ १८१७–१९; पृष्ठ
भूभ्र–भूतावर भ्रमण; पृष्ठ
मराचि–मल्हार रामराव चिटणीस कृत शिवाजी महाराजांचें सप्त-प्रकरणात्मक चरित्र; पृष्ठ
रा–राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड व लेखांक
वैद–वैद्य दप्तर; खंड, वर्ष, लेखांक
शिचप्र–शिवचरित्रप्रदीप, पृष्ठ
शिचवृसं–शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड व पृष्ठ
शिभा–शिवभारत, अध्याय व श्लोक
सरकार–शिवाजी अँड हिज टाइम्स ५ वी आवृत्ति; पृष्ठ
सभा–सभासद बखर ४ थी आवृत्ति; पृष्ठ
समा–सनदापत्रांतील माहिती; पृष्ठ
सं–ऐसंसा
संराच–संभाजी व राजाराम यांचीं चरित्रें मराचिकृत; पृष्ठ

प्रकाशक :– श्री. ग. ह. खरे, ३१३ अ, सदाशिव, पुणें २.

त्यांपैकीं कांहींवर पुस्तकें झालींही आहेत. पण एक तर तीं आतां त्रोटक व जुनीं पुराणीं झालीं आहेत. शिवाय त्यांत मुसलमानी कालांत घडलेल्या प्रसंगांचा निर्देश बहुतेक नसतो. यामुळें नव्या आवृत्तींची आवश्यकता असते. उदाहरणार्थ माझेंच 'भोर संस्थान ऐतिहासिक स्थलदर्शन' हें पुस्तक घ्याना. त्यांत मी सात किल्ल्यांचा धावता इतिहास देण्याचा प्रयत्न केला आहे. पण तें पुस्तक अशा परिस्थितींत घडलें कीं, त्यांत आली तेवढीच माहिती घालणें शक्य होतें. तेथें द्रव्य, काल व पृष्ठें या तिहींनाही मर्यादा होती. त्यांतील निर्दिष्ट गडांचा किती तरी तपशीलवार इतिहास देणें शक्य आहे. पण तो काढावयाचा कोणी, छापावयाचा कसा आणि त्याचें पुस्तक खपणार केव्हां, तिन्ही प्रश्नच आहेत. आमचे वाचक असे आहेत कीं, ते भडक वर्णनांच्या काल्पनिक लघुकथा किंवा कादंबऱ्या यांसाठीं मोठ्या खुशीनें रुपया खर्च करतील; पण ज्ञानवर्धक पुस्तकासाठीं आठ आणे खर्च करतांना त्यांच्या जीवावर येईल, दहादां मागेपुढें करतील, पुस्तकाचीं पानें मोजतील, चित्रें आहेत कीं नाहींत पाहतील, याचा आपणास कितपत उपयोग आहे असा गहन प्रश्न मनास विचारतील आणि घेतलें नाहीं तरी चालेल असा निर्णय घेतील. प्रकाशकांत एखादाच असा आहे कीं जो फायदा थोडा कमी मिळाला तरी चालेल; पण ज्ञानवर्धक पुस्तकेंच छापतो. वाचकांना काय पाहिजे याचा विचार करण्याऐवजीं वाचकांनीं काय घेतलें पाहिजे याचा विचार करून तेवढेंच छापणारा प्रकाशक विरळाच. शिवाय या सर्व व्यवहारांत लेखकाच्या हातीं काय पडतें हा प्रश्नच असतो. त्याला अकिंचनच रहावें लागतें. मग ज्ञानवर्धक पुस्तकें तयार व्हावीं कशीं, छापलीं जावीं कशीं व प्रसृत व्हावी कशीं ?

आम्हांला स्वराज्य मिळून आठ वर्षें झालीं. पण मुंबई राज्यांतील मराठी भाषेंतील लेखकांची ग्रहदशा अजून तरी संपलेली दिसत नाहीं. इंग्रजी भाषें-तील पुस्तकांच्या खपास सर्व जगभर क्षेत्र असल्यानें त्यांना विशेषत: त्या भाषेंतील संकलनात्मक पुस्तकांना वास्तविक सरकारनें आश्रय देण्याचें कांहींच कारण नाहीं. सरकारनें ५१२५ प्रती घेतल्या काय, न घेतल्या काय, त्याची अशा पुस्तकांच्या प्रकाशकांना दिक्कत नसते. पण अशा पुस्तकांच्या प्रति सरकार भर किंमतीस विकत घेऊन तें पुस्तक विकत घेण्याचें सामर्थ्य अस-णाऱ्यांनाही फुकट वाटतें; पण मराठी पुस्तकाच्या दहापेक्षां अधिक प्रति घेण्या-सही तयार होत नाहीं. कांहीं राज्यांत ही स्थिति बदलत आहे असें दिसतें. पण मुंबई राज्य मुंगीच्या गतीनें आणि जुन्या धोरणानेंच पावलें टाकीत आहे असें दिसतें. ही परिस्थिति पालटलीच पाहिजे.

ग. ह. खरे

अनंत चतुर्दशी श. १८७७ (१।९।१९५५)

श्री. ग. ह. खरे यांची साहित्यसेवा

१,२ शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २ (अंशतः) (१९३०) ७ रु.
३ मंडळांतील नाणीं (१९३३) १ रु.
४, ५ शिवचरित्रसाहित्य खंड ३ (अंशतः) व ६ (पूर्णतः)
(१९३०, ३७) ३ व १॥ रु.
६–९ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १ ते ४
(१९३४, ३७, ३९, ४९) १ ते ३ प्रत्येकीं १॥ रु. ; ४ चें ३ रु.
१०–१२ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ ते ३
(१९३०, ३४, ४९) १॥, २ व ३ रु.
१३, १४ शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड २ व ३ (फार्सी साधनांचे अनुवाद)
(१९३९, ४१) प्रत्येकीं १॥ रु.
१५, १६ हिंगणे दप्तर खंड १ व २ (१९४५, ४७) प्रत्येकीं ३ रु.
१७ भोर संस्थान ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयप्रदर्शिका संपलें ८ आ.
१८ भोर संस्थान ऐतिहासिक स्थलदर्शन (संपलें) (१९४५) ८ आ.
१९ ऐतिहासिक आख्यायिका (संपलें) (१९४४) ४ आ.
२० पंढरपूरचा विठोबा (१९४७) ४ आ.
२१ लाठी शिक्षक भाग १ (संपलें) (१९२८) २ आ.
२२ श्रीक्षेत्र आळंदी (१९३१) ४ आ.
२३ श्रीविठ्ठल आणि पंढरपूर (दुसरी आवृत्ति) (१९५३) १ रु.
२४ मूर्तिविज्ञान (१९३९) २५ रु.
२५ संशोधकाचा मित्र (पहिला भाग) (१९५१) ४ रु.
२६ Simhagadh (Second edition) (१९५३) ४ आ.
२७ तुलादानविधि (१९४८) ८ आ.
२८ सिंहगड (दुसरी आवृत्ति) (१९५५) ८ आ.
२९ शनिवार वाडा (दुसरी आवृत्ति) (१९५१) ८ आ.
३० Explorations at Karad (१९४९) ५ रु.
३१ पेशवे दप्तर–पत्रें : कालनिर्णय–सुधारणा (१९५०) ८ आ.
३२ Shanivara Palace (१९५०) १० आ.
३३ इतिहासकर्ते मराठे (१९५१) २ रु.
३४ विजयनगर सम्राट कृष्णदेवराय (१९५१) ४ आ.
३५ इतिहासाभ्यासवर्ग–व्याख्यानें (१९५२) ८ आ.
३६ सिंहगड (हिंदी) (१९५३) ४ आ.
३७ शिवचरित्रसंशोधनवृत्त (रा. श. २७९) (१९५३) ४ आ.
३८ सर ऑरेल स्टीन (१९५३) ४ आ.

२५५ इंग्रजी–मराठी (६७+१८८) लेख

मुद्रक : शं. रा. दाते, यशवंत छापखाना, २००/३ सदाशिव पेठ, पुणें २.